रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १०१ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि.१७ सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹


## ११ लाख ७३ हजारांची फसवणूक

**पनवेल :** मोबाईल ॲप डाऊनलोड करण्यास सांगून जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले आणि ११ लाख ७३ हजारांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी चार अनोळखी इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल चार्ल्स हे नावडे फेज टू तळोजा येथे राहतात. त्यांना फेसबुकवर सोशल नेटवर्किंग ॲपवर शेअर मार्केट संबंधित कलेक्टिव्ह ट्रेनिंग बाबत जाहिरात दिसली. त्यांनी त्या नंबरवर संपर्क केला. यावेळी समोरील इसमाने ॲपबाबत माहिती दिली आणि ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. गुंतवणूक केलेल्या रकमेवर ६० ते ९० टक्के नफा मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी पाच हजार रुपये भरून शेअर्स घेतले. एका आठवड्यात त्यांना भरलेली पान २ वर

## फसवणूक करणाऱ्या वकिलाला अटक

**पनवेल :** न्यायालयाच्या बनावट आदेशाची प्रत फसवणूक करण्याच्या उद्देशाने ॲड. व्ही.के. शर्मा यांनी तयार करून सागर घरत यांना देऊन लाधवजी पटेल आणि न्यायालयाची फसवणूक केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १२ सप्टेंबर रोजी ॲड. शर्मा (रा. खारघर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पनवेल शहर पोलिसांनी या आरोपीला अटक केली. यातील फिर्यादी लाधवजी पटेल हे बांधकाम व्यवसायिक असून वाशी येथे राहतात. त्यांच्या कंपनीला व्यवसायासाठी उलवे येथील सेक्टर १७ मधील एकूण क्षेत्र १०.५० गुंठे ही जमीन खरेदी करण्यासाठी मयत हिस्सेदार शेतकरी मदन घरत यांचे वारस असलेली अल्पवयीन मुले यांचे मायनर सर्टिफिकेट काढणे आवश्यक होते. त्यासाठी जुलै पान २ वर






### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा

# पुढल्या वर्षी उडणार धुरळा

**31 जानेवारी पर्यंतची डेडलाईन**

**सर्वोच्च न्यायालयाने दिले आदेश**



**| रायगड | प्रतिनिधी |**

**महाराष्ट्रातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी जानेवारी २०२६ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी करणारा अर्ज राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सादर केला होता. त्यावर मंगळवारी (दि.१६) सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने राज्य राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. निवडणूक आयोगाला आता ३१ जानेवारीपर्यंत या निवडणुका घ्याव्या लागणार आहेत.**

सर्वोच्च न्यायालयात आज महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांप्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाकडून निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदवाढ मिळाली आहे. यामुळे निवडणूक आयोगासह राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. ही मुदतवाढ मिळावी यासाठी आयोगाने कर्मचाऱ्यांची कमतरता, ईव्हीएमचा मुद्दा, सणसमारंभासह वेगवेगळी कारणे दिली होती. न्यायालयाने आयोगाचे मुद्दे लक्षात घेत त्यांना निवडणुका घेण्यासाठी मुदतवाढ दिली आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेली चार-पाच वर्षे ओबीसी आरक्षणासह विविध कारणांमुळे लांबणीवर पडल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने अखेरीस याप्रकरणी मे महिन्यात झालेल्या सुनावणीवेळी निवडणुकांना दिलेली स्थगिती उठविली आणि चार महिन्यांत म्हणजेच ऑक्टोबर २०२६ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले होते. त्यानुसार आयोगाने प्रभागांची पुनर्रचना, आरक्षणे, मतदारयाद्या अद्यायावत करणे, आदी प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, कर्मचाऱ्यांच्या कमतरतेसह इतर काही कारणे पुढे करत निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी मुदतवाढ मागितली होती. न्यायालयाने ही मागणी मान्य केली आहे.

### कोर्टाची महत्त्वाची सूचना

**याआधी मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने ४ महिन्यात या निवडणुका घेण्याचा आदेश दिला होता. मात्र पावसामुळे आणि इतर कारणामुळे निवडणुका होऊ शकलेल्या नाहीत. ओबीसी आरक्षणाच्या अंमलबजावणीशी संबंधित निकालामुळे २०२२ पासून या निवडणुका रखडलेल्या आहेत. मात्र आता कोर्टाने निवडणूक घेण्याचे अंतिम आदेश दिले आहेत. त्यामुळे आता पुढील ४ महिन्यांमध्ये या निवडणुका पार पडणार आहेत. कोर्टाने आज निवडणुकीसाठी स्पष्ट वेळापत्रक घालून दिलं आहे. याआधी दिलेली चार महिन्यांची दिलेली मुदत संपल्यावर अर्ज दाखल केल्याने कोर्टाने नाराजी व्यक्त केली. निवडणूक आयोगाने कमी, बोर्ड परीक्षा आणि स्टाफ कमी आहे अस कारण कोर्टाला सांगितलं, मात्र कोर्टाने बोर्ड परीक्षेचं कारण फेटाळून लावलं तर बाकी दोन कारणासाठी सूचना दिल्या आहेत. प्रभाग रचना ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत पूर्ण झाल्याचं पाहिजे अस कोर्टाने सांगितलं आहे. तसेच नोव्हेंबर महिन्यात पूर्तता झाली पाहिजे असंही कोर्टाने म्हटलं आहे.**

### हलगर्जीपणावर ठेवले बोट

**सर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ देताना स्पष्ट केलं आहे की ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व प्रकारच्या निवडणुका पार पडल्या पाहिजेत. तसेच राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या ज्या मागण्या असतील त्यासंदर्भात राज्य सरकारकडे पाठपुरावा करावा असं सांगितलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला सांगितलं आहे की ईव्हीएमची मागणी, कर्मचाऱ्यांची मागणी यासंदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवा. सर्व मागण्या कशा पूर्ण करता येतील, कामाचे टप्पे कसे असतील यासंदर्भात न्यायालयाने आयोगाला वेळापत्रक दिलं आहे. मागील सुनावणीवेळी चार महिन्यात निवडणुका घेऊ म्हणणाऱ्या निडणूक आयोगाचा हलगर्दीपणा झाल्याचं दिसत आहे, अशी टिप्पणी देखील न्यायालयाने यावेळी केली.**

### वेधक

## मोनोरेल अनिश्चित काळासाठी बंद

**मुंबई :** चेंबूर जेकब सर्कल मोनोरेल मार्गिकेवर महिन्याभरात तीन वेळा तांत्रिक बिघाड होऊन मोनोरेल गाड्या बंद पडण्याच्या घटना घडल्या. यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचा मुद्दा उपस्थित करीत मोनोरेल प्रकल्पावर टीका होऊ लागली आहे. दरम्यान, आता मोनोरेल मार्गिका काही काळासाठी बंद करण्याचा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी जाहीर केला आहे. मोनोरेल मार्गिका केव्हापासून आणि किती काळासाठी बंद राहील, यासंबंधीची माहिती अद्याप एमएमआरडीएकडून उपलब्ध पान २ वर

## ज्वारी घेऊन जाणारा ट्रक पलटी

**पनवेल:** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून ज्वारी घेऊन जाणारा ट्रक पलटी झाल्याची घटना मंगळवारी (दि.१६) पहाटे सहाच्या सुमारास घडली. या अपघातात टेम्पो चालकाचा मृत्यू झाल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांनी दिली. के.ए. ३२ सी. ३७१८ या क्रमांकाचा ज्वारीने भरलेला ट्रक वाशीच्या दिशेने मुंबई-पुणे एक्सप्रेस वेने जात होता. ट्रक पहाटे सहाच्या सुमारास नवीन पनवेल सेक्टर सहा जवळील नेवाळीकडे जाणाऱ्या ब्रिजजवळ आला असता टेम्पो ब्रिजवरून खाली कोसळला. हा अपघात एवढा मोठा होता की, या टेम्पोची दोन चाके वर पान २ वर

## केळशी येथे चरस तस्करीचा पर्दाफाश

**दापोली :** दापोली तालुक्यात अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई करण्यात आली असून, केळशी किनारा मोहल्ल्यात पोलिसांनी छापा टाकून सुमारे चार लाख रुपये किमतीचा चरस जप्त केला आहे. विशेष म्हणजे, या चरसच्या पॅकेजिंगवर असा इंग्रजी मजकूर आणि काही कोरियन भाषेतील अक्षरे लिहिलेली आढळली आहेत. ज्यामुळे या तस्करीचे आंतरराष्ट्रीय कनेक्शन आहे का? असा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीला अटक केली असून, दापोली तालुक्यात या घटनेमुळे खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास पान २ वर

## संगणक प्रचालक मानधनाविना

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**



केंद्र व राज्य शासन पुरस्कृत कृषी विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी संगणक प्रचालक गेल्या अनेक वर्षापासून काम करीत आहेत. मात्र गेल्या सहा महिन्यांपासून त्यांना मानधन दिले नसल्याची माहिती समोर येत आहे. संगणक प्रचालकर मानधनाविना काम करीत असल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, राज्य पुरस्कृत नमो शेतकरी महासन्मान निधी योजना शासनाने सुरू केली. या योजनेअंतर्गत ऑनलाईन कामे गतीमान व्हावी म्हणून जिल्ह्यात संगणक प्रचालकांची नियुक्ती केली. कोकण विभागात ६० हून अधिक प्रचालक असून रायगड जिल्ह्यात १६ जणांचा समावेश आहे. कंत्राटी स्वरुपात नेमण्यात आलेल्या या प्रचालकांमार्फत योजनांची कामे करून घेण्यात आली. परंतु एप्रिल महिन्यांपासून या कर्मचाऱ्यांचे मानधनच दिले नसल्याची माहिती देण्यात आली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना अशा अनेक कृषी विषयक पान २ वर

> **मागील एप्रिल महिन्यांपासून मानधन मिळाले नाही. त्यामुळे महिन्याचा खर्च कसा भागवायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे शासनाने लवकरात लवकर मानधन द्यावे अशी मागणी होत आहे. याबाबत कोणक विभागातील कृषी अधिकारी व जिल्हा कृषी अधिकारी यांना निवेदन दिले आहे. - संगणक प्रचालक( नाव न सांगण्याच्या अटीवरून)**

### बाळ्या मामांच्या आंदोलनामुळे

## स्थानिक भाजप नेते बॅकफूटवर

**| पनवेल ग्रामीण | वार्ताहर |**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालालोकनेतेमाजीखासदार दि.बा.पाटील यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी भिवंडीचे खासदार बाळ्या मामा यांच्याकडून करण्यात आलेल्या आंदोलनाकडे स्थानिक भाजपा नेत्यांनी पाठ फिरवल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला माजी खासदार लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव देण्यात यावे, या मागणीकरीता स्थापन करण्यात आलेल्या लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीवर भाजप नेत्यांचाच वरचष्मा असून, अध्यक्ष पद सोडल्यास उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, पदासोबत समितीच्या कार्यकारणीत तसेच सल्लागार पदावर भाजपच्या नेत्याचाच जास्त भरणा आहे. नामकरणाच्या मागणीकरीता यापूर्वी करण्यात आलेल्या आंदोलनात भाजपच्या पनवेल, उरण आणि नवी मुंबईमधील स्थानिक नेत्यांचेच वर्चस्व असल्याचे पाहायला मिळत होते.देशात आणि राज्यात भाजपाचे सरकार असतानाही कृती समितीच्या नावाखाली करण्यात आलेल्या प्रत्येक आंदोलनात भाजप कार्यकर्त्यांसोबत इतर पक्षातील कार्यकर्ते देखील हिरहिरीने सहभागी होत होते. अशावेळी नवी मुंबई विमानतळावरून पहिल्या विमान उड्डाणाची तारीख जाहीर करण्यात आल्याने भाजपच्या स्थानिक नेतृवाच्या मागणीखातर विमानतळाला पान २ वर

### उरण-भाजपा आमदारांच्या आंदोलनातील अनुपस्थितीमुळे प्रकल्पग्रस्त नाराज

### आंदोलनाचे केंद्र पनवेल, उरण बाहेर

नामकरण कृती समितीवर भाजपाच्या स्थानिक नेतृत्वाच्या असलेल्या वर्चस्वामुळे पनवेल, उरण आणि नवी मुंबई आंदोलनाचे केंद्र ठरले होते. खासदार बाळ्या मामा यांच्या आंदोलनामुळे प्रथमच आंदोलनाचा केंद्रबिंदू पनवेल, उरण बाहेर सरकला आहे.

> **यापूर्वी झालेल्या आंदोलनात भाजप नेत्यांचे आमंत्रण स्वीकारून कृती समितीच्या बैठकीत भूमिपुत्रांनी उपस्थिती दर्शवली आहे. मग भूमिपुत्रांसाठी नेत्यांनीही बाळ्या मामांच्या पुढाकारे घेतलेल्या दिबा मानवंदना रॅलीत सहभागी व्हायला काय हरकत होती? उरणच्या आमदारांकडून तशीही अपेक्षा नाही. मात्र बाकीचे आमच्या रक्ताचे भूमिपुत्र आहेत. त्यांनी दाखवलेल्या अनुपस्थितीमुळे समाजाने जो बोध घ्यायचा तो घेतला आहे. परंतु या निमित्ताने पुन्हा एकदा भूमिपुत्र बांधव एक झाला आहे. भूमिपुत्र लढत राहणार. कोणी येवो अगर न येवो नवी मुंबई विमानतळाला दिबांचंच नाव लागणार. - योगेश तरे, कार्यकारिणी सदस्य.**

## १८ सप्टेंबरला 'रस्ता अदालती'चे आयोजन

**| रायगड | प्रतिनिधी |**

उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या कार्यालयात गुरुवारी (दि.१८) दुपारी १२ वाजता रस्ता अदालत आयोजित करण्यात आली आहे. या रस्ता अदालतीमध्ये अलिबाग व मुरुड तालुक्यातील व यान्यायालयातील संबंधित सर्व मान्यवर विधिज्ञ, संबंधित पक्षकारांच्या पुढाकाराने रस्त्यांविषयक प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्यात येणार आहे.

यासाठी दाखल असलेल्या प्रकरणांमध्ये होणाऱ्या सुनावणीकामी संबंधित विधिज्ञ व त्यांचे पक्षकार यांनी समेटाने मिटणाऱ्या प्रकरणांमध्ये लेखी म्हणणे न चुकता सादर करावे, असे आवाहन प्रांताधिकारी मुकेश चव्हाण यांनी केले आहे.

महसूल विभाग हा जनतेच्या दैनंदिन समस्या आणि जिव्हाळयाच्या विषयांशी अत्यंत जवळून संबंध असलेला विभाग आहे. सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक होण्याची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने, शासन, महसूल व वनविभागाकडील निर्णय दि.०१ सप्टेंबर २०२५ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पान २ वर

## गुणवत्ता वाढीसाठी शिक्षण विभागाचा पुढाकार

### जिल्ह्यात ठिकठिकाणी कार्यशाळेमार्फत जनजागृती

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**




जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या, विद्यार्थ्यांची शैक्षणिक बुध्दीमत्ता वाढावी, यासाठी शिक्षण विभागाने पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यात तालुका व बीट स्तरावर ठिकठिकाणी कार्यशाळा घेऊन जनजागृती केली जात आहे. अलिबाग तालुक्यातील पोयनाड बीटातील शिक्षकांची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची क्षमता, अभिरुची, आवडी, दृष्टीकोन आणि शैक्षणिक उपलब्धतता, व्यक्तिमत्व वैशिष्ट्ये याबाबत विस्तार अधिकारी कृष्णा पिंगळा यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करीत पटसंख्या वाढीसाठी आवाहन केले.

जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहे. दप्तराविना शाळेपासून खेळता खेळता शिक्षण सारखे उपक्रम राबविले जात आहे. शाळा बाह्य विद्यार्थ्यांना शोधून त्यांना शाळेत दाखल करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना पाठिविण्याचे फायदे अशा अनेक प्रकारचे उपक्रम राबवून पटसंख्या वाढीचा प्रयत्न केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी कार्यशाळा सुरु केल्या आहेत. तालुकास्तरावरील विस्तार अधिकारी, पान २ वर




## एकदरामध्ये घरावर कोसळली दरड

**| मुरुड| प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील एकदरा गावात मंगळवारी (दि.१६) सकाळी १० ते १०:३० वाजण्याच्या सुमारास महेश साळुंखे व श्रीकेश साळुंखे यांच्या घराच्या मागील बाजूस दरड कोसळली. यामध्ये महेशच्या स्वयंपाक घराचे मोठे नुकसान झाले आहे.

मंगळवारी (दि.१६) सकाळच्या सुमारास ही घटना घडली. सुदैवाने महेश यांची पत्नी स्वयंपाक घरातील कामे उरकून हॉलमध्ये गेल्यामुळे संभाव्य धोका टळला आहे. या घटनेमध्ये साळुंखे यांच्या स्वयंपाक घराचे मोठे नुकसान झाले आहे. येत्या काही दिवसांत रायगड जिल्ह्यात अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. तरी अजून मोठ्या प्रमाणात पाऊस पडत नसताना जर इतके नुकसान होत असेल तर अति मुसळधार पाऊस सुरू झाला तर किती नुकसान होऊ शकेल, याचा विचार करण्याची गरज आहे.

### नेरळ-माथेरान मिनी ट्रेन मार्गावर दरड कोसळली | पर्यटकांच्या पदरी निराशा

# मिनीट्रेनचा मुहूर्त टळला

**| नेरळ | प्रतिनिधी |**



देशभरातीलपर्यटकांचीलाडकी नेरळ-माथेरान मिनीट्रेन यावर्षी पावसाळी सुट्टीनंतर नेहमीच्या वेळी म्हणजेच ऑक्टोबर महिन्यात सुरु होण्याची शक्यता मावळली आहे. माथेरान मिनीट्रेनच्या म र्गावर दोन ठिकाणी मोठ्या दरडी कोसळण्याची शक्यता आहे. २५ मे पासून मिनीट्रेन बंद असून दरवर्षी मिनीट्रेन १५ ऑक्टोबर रोजी सुरु होते. मात्र यावर्षी जोरदार पाऊस झाल्याने मिनीट्रेन मार्गावर दरडी कोसळण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत.

ब्रिटिश काळात सुरु झालेल्या मिनीट्रेनची वाहतूक यावर्षी २५ मे रोजी थांबवण्यात आली होती. दरवर्षी मिनीट्रेन १५ जून ते १५ ऑक्टोबर या कालावधीत बंद असते. मात्र यावर्षी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पाऊस सुरु झाला आणि त्यानंतर मे महिन्यात पूर्ण महिनाभर पाऊस सुरु राहिल्याने यावर्षी पर्यटकांनी धुक्याच्या दुलईचा अनुभ नेरळ-माथेरान या २१ किलोमीटर मार्गावर घेतला. मात्र २५ मे रोजी मुसळधार पाऊस सुरु झाला आणि त्यानंतर दोन-तीन दिवस सुरूच राहिला होता. त्यावेळी खबरदारी म्हणून मिनीट्रेनची वाहतूक बंद करण्यात आली होती. पावसाचा जोर कायम राहिल्याने एक जून रोजी मध्य रेल्वे प्रशासनाने नेरळ-माथेरान मार्गावरील मिनीट्रेनची वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेतला.

माथेरान घाटात यावर्षी सर्वाधिक पाऊस झाला असून पाच हजार मि.मी पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. त्यात पॅनोरमा पॉईंटच्या भागात गणेश उत्सवाच्या आधी मोठा भाग कोसळला आणि त्यात मिनीट्रेनच्या मार्गाचे मोठे नुकसान झाले होते.तसेच नॅरोगेज मार्गाच्या दुरुस्तीचे काम सुरु असताना आता या मार्गावर पुन्हा एकदा मोठ्या पान २ वर

**अमन लॉज स्थानकातून माथेरानकरिता**

०८.४५,०९.३५,१२.००,.०२.४ ५,०३.४०,०५.४५

**शनिवार रविवार**

१०.३०,०१.३५

**माथेरान ते अमन लॉज शटल सेवेचे वेळापत्रक**

**सकाळी** ८.२०, ९.१०, ११.३५, **दुपारी** २, ३.१५, **सायंकाळी** ५.२०

**शनिवार रविवार**

१०.०५,०१.१०

## जाहिरात फलकांसाठी होणार ई-लिलाव

**| रायगड | प्रतिनिधी |**




राज्याच्या मोठ्या शहरातील मोकळ्या सरकारी जागेवर जाहिरात फलक उभारण्याबात धोरण निश्चित करण्यात आले आहे. या धोरणानुसार जिल्ह्यातील सर्व शहरी, निमशहरी तसेच ग्रामीण भागातील आणि राज्य व राष्ट्रीय महामार्गालगत असणाऱ्या जागेवर जाहिरात फलक उभारण्यासाठी ई-लिलाव केला जाणार आहे. या लिलावात सर्वाधिक बोली लावणारा कंत्राटदार पात्र ठरवला जाणार असून त्यासोबत पाच वर्षांचा करार केला जाणार आहे.

राज्याच्या विविध भागांत आतापर्यंत सरकारी जागांवर जाहिरात फलक लावण्याची परवानगी विशिष्ट अटी-शर्तींवर दिली जात होती. राज्य शासनाने आता या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले असून जिल्हाधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य शासकीय जागा शोधून, त्यांची शासकीय प्रतिनिधी मार्फत स्थळ पाहणी करून जाहिरात फलक उभारण्यासाठी जागा निश्चित करणे तसेच क्षेत्रफळ निश्चितीची जबबादारी जिल्हाधिकाऱ्यांवर राहणार आहे.

यानंतर ई-लिलाव प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्याचबरोबर लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वोच्च बोली प्राप्त पात्र कंत्राटदारास पाच वर्षांसाठी जागेचा वापर करण्याची परवानगी देण्यात येईल. तर नूतनीकरण करताना संस्थेविरुद्ध कोणतीही तक्रार किंवा कारवाई प्रलंबित नसल्याची खात्री केल्यानंतर भाड्यात २५ टक्के वाढ करण्यात येईल, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, लिलाव प्रक्रियेत सहभाग घेणारी व्यक्ती किंवा संस्था महाराष्ट्रातील पान २ वर

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

# जिल्ह्यात करणार अंमलबजावणी

### ■ मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गावांचा शाश्वत विकास साधण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची घोषणा करण्यात आली आहे. हे अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान राबविण्यात येणार असून, या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद प्रशासन सज्ज झाले आहे.

अभियानांतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम तसेच आवश्यक सूचना दिल्या आहेत. या अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना राज्य शासनाकडून पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले म्हणाल्या की, ग्रामीण भागात विकासाच्या बहुतांश योजना ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांच्या माध्यमातून राबविण्यात येतात. त्यामुळे त्यांना कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविणे आवश्यक आहे.

योजनांची प्रभावी व जलदगतीने अंमलबजावणी करून, त्यांचा लाभ ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, यातून ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे, ग्रामपंचायतीमध्ये लोकसहभागाची चळवळ निर्माण करणे, ग्रामीण नागरिकांना सुलभ रीतीने सेवा देणे, महाराष्ट्रातील थोर संत परंपरेचा सहभाग घेणे, आरोग्य, शिक्षण, उपजीविका, सामाजिक न्याय या मुख्य क्षेत्रामध्ये ग्रामपंचायतीचा सहभाग वाढवून पंचायत राज संस्था गतिमान करणे या संकल्पनेतून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राज्य शासनाने जाहीर केले आहे.

हे अभियान तालुका, जिल्हा, महसूल विभाग आणि राज्य अशा चार स्तरांवर राबविले जाणार आहे. यामधून ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांना मोठ्या रकमेचे पुरस्कार मिळवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. १७ सप्टेंबर रोजी सर्वा ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्राम सभेचे आयोजन करण्यात आले आहे. हे अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्याकरिता जिल्ह्यातील सर्व सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी यांची जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय कार्यशाळा संपन्न झाल्या आहेत.

१७ सप्टेंबर रोजी सर्व ग्रामपंचायतींना विशेष ग्रामसभेचे आयोजन केलेले आहे. गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, अधिकारी, वकील, डॉक्टर, पत्रकार, व्यावसायिकांना निमंत्रित करावे तसेच त्यांचा यथोचित सन्मान करावा. तसेच गावातील महिला बचत गट, शिक्षक, जिल्हा परिषद कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, ग्रामस्तरीय सर्व शासकीय कर्मचारी, पोलीस पाटील, कोतवाल, युवक, भजनी मंडळ, युट्यूब व इन्स्टाग्रामवर प्रसिद्ध व सक्रीय कार्यकर्ते, शासनाचे विविध योजनांचे लाभार्थी ग्रामसभेस उपस्थित राहणार आहेत. या ग्रामसभांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत.

या अभियानाचे लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन तयार करणे, सक्षम पंचायत, स्वनिधी, विकासनिधी व लोकवर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे, गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे, उपजिविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ हे प्रमुख सात घटक आहेत.

## शेजाऱ्यांनी केली दागिन्यांची चोरी

**पनवेल :** शेजारी राहणाऱ्यांनी घराची डुप्लिकेट चावी बनवून सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सन्ना शेख तळोजा येथे राहत असून या पाच सप्टेंबर रोजी घराला लॉक करून आई-वडिलांना भेटण्यासाठी गेल्या. त्यावेळी सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा दोन लाख ९४ हजार रुपयांचा ऐवजाची चोरी करण्यात आली. शेख यांनी त्यांच्या शेजारी राहणाऱ्यांचे घर तपासले असता आलिया, मुस्कान आणि जावई मुजीमब यांचे घर चेक केले. यावेळी चोरीला गेलेले सोन्याची नथनी, चिल्लर त्यांच्याकडे होती. त्यांनी घराची डुप्लिकेट चावी बनवून सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केली.

## अभियंता सुदर्श आगलावे यांचा आदर्श अभियंता पुरस्काराने सन्मान

**। रसायनी । वार्ताहर ।**

शाखा अभियंता रायगड जिल्हा परिषद उपविभाग अंतर्गत विभाग खालापूर येथील अभियंता सुदर्शन सिताराम आगलावे यांना रायगड जिल्हा परिषद अलिबाग बांधकाम विभागाच्या वतीने आदर्श अभियंता पुरस्काराने मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

जिल्हा परिषद अभियंता संघटना महाराष्ट्र जिल्हा शाखा रायगड यांच्या वतीने भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिनाचे औचित्य साधून सत्कार करण्यात आला.अभियंता सुदर्शन सीताराम आगलावे हे खालापूर येथे क्रियाशील आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात त्यांचा तत्पर आणि क्रियाशील अभियंता म्हणून उल्लेख केला जातो. खालापूर तालुक्यातील अनेक बांधकाम उत्कृष्ट दर्जाची झाली असून कामाची गुणवत्ता, कामाच्या ठिकाणी भेटी, अंदाज पत्रक तयार करणे, अंतिम मूल्यांकन करण्यासाठी साठी या तत्पर म्हणून त्यांचा उल्लेख होतो. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, सत्यजीत बढे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे, कार्यकारी अभियंता राहुल देवांग, कार्यकारी अभियंता मोहन सरोदे, सुजित धनगर, सचिव भोजवंता अमृतराव शिंदे, कार्याध्यक्ष संजय सदानंद कवठेकर, उपाध्यक्ष सतिश भानुदास जगताप, उपाध्यक्ष अल्पना अनिल जाधव यांच्यासह अभियंता, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## रेवदंडा येथून युवती बेपत्ता

**। रेवदंडा । वार्ताहर।**

रेवदंडा येथून २९ वर्षीय सिध्दी दिलिप काटवी ही राहत्या ब्लॉकमधून बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या पालकांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात केली आहे.



सिद्धी दिलीप काटवी वय २९ वर्ष राहणार गोरेगाव मुंबई ही नोव्हेंबर २०२४ पासून त्यांचे रेवदंडा येथील ब्लॉक मध्ये राहावयास आलेली होती. तिची मानसिक स्थिती ठीक नव्हती व ती सतत चिडचिड करीत होती. दिनांक सहा ऑगस्ट २०२५ रोजी मुलीचे आई-वडील रेवदंडा येथील ब्लॉकवर त्यांच्या मुलीला भेटण्यास आले असता ती सदर ठिकाणी मिळून आली नाही तसेच तिचा मोबाईलदेखील बंद येत असल्याने ती कुठेतरी हरवली असल्याबाबत खात्री झाल्याने तिचे वडील दिलीप चंद्रकांत काटवी यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.मिसिंगचा तपास पोलीस हवालदार महेंद्र राठोड हे करीत आहेत. मिसिंग मुलीचे वर्णन- रंग निमगोरा, उंची पाच फूट, बांधा सडपातळ, पोशाख मरून रंगाचा पंजाबी ड्रेस, कानात आर्टिफिशियल टॉप, पायात हिलच्या चप्पल आहेत.

## मुरुड नगरपरिषद शाळेला साहित्य वाटप



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड मधील सामाजिक बांधिलकी जोपासणारी विश्वसनीय संस्था परिचित महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे सी.एस. आर.फंडातून नगरपरिषद प्राथमिक शाळेला शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव, प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर, महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अजित गुरव, उपाध्यक्षा अनघा चौलकर, माजी अध्यक्ष संजय गुंजाळ, प्रमोद भायदे, चंद्रकांत अपराध,सदस्या सायली गुंजाळ, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, बांधकाम समिती सदस्य अशोक विरकुड, मंगेश पाटील, संचालक आदेश दांडेकर, अमोल रणदिवे, संदेश दांडेकर, महेंद्र पाटील, व्यवस्थापक राकेश मसाल व कर्मचारी वृंद, आंबेतकर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन, महात्मा फुले यांच्या प्रतिमेला व सरस्वती मातेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सचिन बच्छाव होते. नगरपरिषदेच्या ६ शाळांना ग्रीन बोर्ड, इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांना कंपास बॉक्स, इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांना पेन -पेन्सिल लेखन साहित्य वाटप करण्यात आले. एकूण २७० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा लाभ मिळाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिपाली दिवेकर यांनी केले. सुत्रसंचालन पल्लवी रेवडे यांनी तर आभार केंद्र प्रमुख राजेश भोईर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका राजश्री गजने, सर्व शिक्षकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मोफत नेत्र शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**। माणगाव । प्रतिनिधी।**

प्रेषित मोहम्मद सर्वांसाठी अंधांना दृष्टी मिळवून देणे हि समाज सेवी भावना नजरेसमोर ठेऊन उम्मत-ए मुस्लिम कमिटी माणगाव व लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय विश्रामगृह जुने माणगाव या ठिकाणी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरात २५० हुन अधिक रुग्णांची तपासणी करण्यात येऊन ६५ रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया व ७५ रुग्णांना चष्मे वाटप करण्यात आले. उम्मत-ए मुस्लिमा कमिटी माणगावच्या या सामाजिक उपक्रमाचे मान्यवरांकडून भरभरून कौतुक करण्यात आले. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी जगाला शांतीचा संदेश दिला. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्म दिवस म्हणून ईद-ए मिलाद साजरी केली जाते. या ईद निमित्त माणगाव तालुक्यातील मुस्लिम बांधवानी एकत्रित येत आपण समाजाचे काहीतरी देणे करी लागतो हा उद्देश नजरेसमोर ठेऊन सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सर्व धर्म समभाव मानून माणगावात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले होते.



**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सूचना**

निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/२३२५/प्र.क्र.१४/ /२०२५ दिनांक : / / २०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government/State Government/Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदारांकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रू. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/१९९/ २०२५-२०२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ मधील भूखंड क्र. १७, सेक्टर-३६, खारघर येथील आरोग्य केंद्राच्या दुसऱ्या मजल्यावर डायलेसिस सेंटर उभारणे. | १,५४,९४,५३८/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. १७/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
अतिरिक्त आयुक्त- I
पनवेल महानगरपालिका

पान १ वरून

## फसवणूक करणाऱ्या वकिलाला अटक

२०२५ मध्ये सागर घरत याने ते प्रमाणपत्र त्याच्या ओळखीचे ॲड. शर्मा यांच्याकडून लवकरात लवकर काढून घेतो, असे सांगून एक लाख रुपये खर्च येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे दहा सप्टेंबर रोजी सागर घरत यांच्या ओळखीच्या वकिलाने अल्पवयीन मुलांचे मायनर प्रमाणपत्र संदर्भातील न्यायाधीशांची बनावट सही व शिक्का असलेली न्यायालयाचे बनावट आदेशाची प्रत फसवणूक करण्याच्या उद्देशाने तयार केली. तसेच सागर घरत (रा. ओवळे) यांना देऊन न्यायालयाची आणि पटेल यांची फसवणूक केली. त्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी १३ सप्टेंबर रोजी आरोपी ॲड. शर्मा याला अटक केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## बाळ्या मामांच्या आंदोलनामुळे स्थानिक भाजप नेते बॅकफूटवर

दिबांचेच नाव दिले जाईल आणि त्याचे श्रेय आपल्या पदरात पडेल या आशेवर असलेल्या नेत्यांच्या आशेवर पाणी फिरवण्याचे काम बाळ्या मामा यांनी केले. परिणामी, भिवंडी ते जासई या दिबांच्या जन्मस्थळापर्यत रॅली काढत केलेल्या आंदोलनात सामील न झालेले स्थानिक भाजप नेते बॅकफूटवर गेले आहे.

कृती समितीचे उपाध्यक्षपद माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्याकडे आहे. परदेश दौऱ्यावर असल्याने रामशेठ आंदोलनात सामील होऊ शकले नसल्याचे बोलले जात आहे.तर कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी असलेले भारतीय जनता पक्षाचे पनवेलचे आ. प्रशांत ठाकूर आणि ऐरोली विधानसभेचे भाजप आ. गणेश नाईक यांचे पुत्र माजी खासदार संजीव नाईक हे देखील आंदोलनात सामील नव्हते. समितीच्या सल्लागार पदाची जबाबदारी भाजपचे माजी खा. कपिल पाटील आणि माजी खा. जगन्नाथ पाटील यांच्यावर टाकण्यात आली आहे. तर कार्यकारणीमध्ये भाजप आ. मंदा म्हात्रे, आ. महेश बालदी, माजी आ. योगेश पाटील, माजी आ. गणपत गायकवाड यांचा देखील समावेश आहे.

## संगणक प्रचालक मानधनाविना

योजनांची कामे सुरुळीत सुरु आहेत. या कर्मचाऱ्यांमार्फत ही कामे केली जात आहेत. मागील सहा महिन्यांपासून मानधन दिले नसल्याने या प्रचालकांची आर्थिक कुचंबना होऊ लागली आहे. त्यांच्यावर मानसिक परिणाम होत आहे. हे कर्मचारी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. मागील पंधरा दिवसापुर्वी गणेशोत्सव जिल्हयात साजरा झाला. या सणासुदीच्या काळातही त्यांना मानधन देण्यात आले नाही. त्यामुळे अनेक प्रश्नांना त्यांना सामोरे जावे लागत आहे. अखेर या कर्मचाऱ्यांनी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कृषी विभागाकडे निवेदन दिले आहे. मानधन लवकरात लवकर देण्यात यावे. मानधनासाठी लागणारा निधी वित्त विभागाकडून मंजूर करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## गुणवत्ता वाढीसाठी शिक्षण विभागाचा पुढाकार

गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्फत बीट स्तरावर कार्यशाळा घेतल्या जात आहेत.

अलिबाग तालुक्यातील पोयनाड बीटातील शिक्षकांची कार्यशाळा विस्तार अधिकारी कृष्णा पिंगळा यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. या कार्यशाळेत काचली, पेझारी, सांबरी केंद्रातील ७३ हून अधिक शिक्षक सहभागी झाले होते. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेची प्रभावी अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले .

जिल्ह्यात पहिली ते आठवीपर्यंतच्या जिल्हा परिषदेच्या दोन हजार ५०१ शाळा आहेत. पाच हजार ८८८ शिक्षक असून ८७ हजार ९२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. जिल्हा परिषद शाळेबाबत विद्यार्थ्यांना आवड निर्माण करण्यासाठी कार्यशाळेचा हा नाविन्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.

## १८ सप्टेंबरला 'रस्ता अदालती'चे आयोजन

जन्मदिन दि.१७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि.०२ ऑक्टोबर २०२५ पर्यतच्या कालावधीमध्ये सेवा पंधरवडा राज्यभर राबविण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

या अभियानामध्ये पहिल्या टप्यामध्ये पाणंद रस्तेविषयक मोहिम राबविण्याची आहे. यास्तव उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयाकडील प्रलंबित असलेल्या रस्ते विषयक प्रकरणांमध्ये या न्यायालयात दि.१८ सप्टेंबर २०२५ रोजी रस्ता अदालतचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## मिनीट्रेनचा मुहूर्त टळला

प्रमाणात दरडी कोसळल्या आहेत. त्यामुळे पुन्हा त्या ठिकाणी दुरुस्तीची कामे करावी लागणार असून या दरडींमुळे मिनीट्रेन वेळेवर सुरु होण्याची शक्यता नाही. माथेरान वॉटरफॉलच्या डाव्या बाजूला मिनीट्रेनचा ट्रॅक आहे. त्या ट्रॅकवर रात्रीच्या दरम्यान दरड कोसळली. ही दुर्घटना रात्रीच्या सुमारास झाल्यामुळे कुठल्याही प्रकारे जीवितहानी झालेली नाही.

## जाहिरात फलकांसाठी होणार ई-लिलाव

रहिवासी व महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे.

जाहिरात फलक उभारण्याबाबत तसेच धोरणातील निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. यामध्ये उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), मुख्याधिकारी (नगरपरिषद/नगरपालिका), उप अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग), पोलीस अधीक्षक (गृह) आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचे जिल्हास्तयावरील प्रतिनिधी यांचा समावेश असेल. ही समिती जाहिरात फलकांची वेळोवेळी

नियम मोडल्यास दुप्पट शुल्क जाहिरात फलकासाठी महानगरपालिका ङ्गअफवर्ग नगरपालिका क्षेत्र वगळता अन्यत्र आवश्यक जागेच्या प्रचलित बाजार मूल्याप्रमाणे येणाऱ्या मूल्यांकनाच्या उपलब्ध दराच्या तीन पट एवढी असेल. तर महानगरपालिका अ वर्ग नगरपालिका क्षेत्र, राष्ट्रीय किंवा राज्य महामार्ग लगतचे क्षेत्र याकरिता किमान रक्कम जागेच्या प्रचलित बाजार मूल्याप्रमाणे येणाऱ्या मूल्यांकनाच्या उपलब्ध मार्जिन कॉस्ट (एमसीएल आर) दराच्या ५ पट एवढी राहील.

या नवीन नियमांनुसार तीन महिन्यांतून सात दिवस सरकारी जाहिराती विनामूल्य लावणे बंधनकारक आहे. राजकीय जाहिरातींना आदर्श आचारसंहितेच्या काळात बंदी असणार आहे. कोणताही नियम मोडल्यास दोन वर्षांच्या भाड्याच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून आकारली जाईल आणि जाहिरातदाराचा करार तात्काळ रद्द केला जाईल, असा इशारा सरकारने दिला आहे.

## मोनोरेल अनिश्चित काळासाठी बंद

झालेली नाही. एमएमआरडीने चेंबूर जेकब सर्कलदरम्यान २० किमी लांबीची मोनोरेल मार्गिका उभारली. २४६० कोटी रुपये खर्चाची ही मार्गिका तोट्यात आहे. या मार्गिकेला प्रवासी संख्याच मिळत नसल्याने हा प्रकल्प पांढरा हत्ती ठरल्याचे चित्र आहे. एकीकडे प्रवासी संख्याच मिळत नसताना दुसरीकडे मोनोरेलमध्ये सातत्याने अपघात होत आहेत. काही ना काही कारणाने वाहतूक विस्कळीत होत आहे. त्यामुळे मोनोरेल प्रकल्प वादात अडकला आहे.

## ज्वारी घेऊन जाणारा ट्रक पलटी

अडकले आणि ट्रक खाली कोसळला. या अपघातात ट्रकवरील चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. ज्यावेळेस टेम्पो ब्रिजवरून खाली कोसळला त्यावेळेस या ठिकाणाहून वाहनांची रहदारी कमी होती अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती.

## केळशी येथे चरस तस्करीचा पर्दाफाश

ही कारवाई करण्यात आली. गुप्त माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी केळशी किनारा मोहल्ल्यातील अब्रार इस्माईल डायली (वय ३२) यांच्या घरावर छापा टाकला. घराच्या मागील बाजूच्या पडवीत केलेल्या तपासणीत पोलिसांना एका गडद लाल आणि सोनेरी रंगाच्या प्लास्टिक वेस्टनमध्ये गुंडाळलेला तपकिरी रंगाचा चरस सापडला. या वेस्टनवर आणि कोरियन भाषेतील अक्षरे लिहिलेली होती. यासोबतच चरस साठवण्यासाठी वापरण्यात येणारी एक पांढऱ्या रंगाची कापडी पिशवीही जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या चरसची अंदाजे किंमत ४ लाख रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

## ११ लाख ७३ हजारांची फसवणूक

रक्कम दुप्पट झाल्याचे ॲपवर दिसले. त्यानंतर दुसऱ्या इसमाने दोन लाख ३१ हजार रुपये भरण्यास सांगितले. त्यांनी पैसे ट्रान्सफर केले. त्यात त्यांना तोटा झाल्याने तो तोटा भरून काढण्यासाठी काही शेअर्स खरेदी करावे लागेल असे सांगून एक लाख ७५ हजार रुपये भरण्यास सांगितले. असे एकूण ११ लाख ७३ हजार रुपये त्यांनी भरले. भरलेले पैसे परत मागितले असता पैसे मिळणार नाहीत असे सांगण्यात आले.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Tender Notice**

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/ Transportation /T-09/ 2025-26 | Annual Contract for Loading & Unloading, transportation of PSC/RSJ poles of all sizes, steel materials, Distribution Transformers, Sub-Station Equipments, Line Material by suitable vehicles under Goregaon Division of Pen Circle. | 20.00 | 20,000/- | 2500+18 %GST= 2950/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 17.09.2025 to Dt. 28.09.2025. Submission of Bid is up to Dt. 29.09.2025 till 17.00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl. Executive Engineer Tel No. 9029135601. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**PRO no. 139** **Executive Engineer, Goregaon Division**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| **Tend-15 / 25-26 7000037619** | AMC of computer & printers at various divisions and substations under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- +GST** | **Limited Rs.20.00 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 17.09.2025 to 03.10.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 03.10.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer(Adm)
Tel No. 022-27459625, Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (THIRD CALL)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No. :-** EE/EHV (O &M) / DIVN/MHD/Tech/E-Tender-18/ IIIrd Call/2025-26 Dtd:-17.09.2025 **RFx No. 7000037133** | **Sub.:-** Third Call for SRM E-tender for Servicing & alignment of 245kV, 145kV and 36kV Isolators at 220kV Kandalgaon Substation, 220kV Mahad Substation & 100kV Roha Substation under EHV (O&M) Division Mahad. | Rs. 15,00,000/- (including GST + 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from **17.09.2025 @ 00:00 hrs. to 26.09.2025 @23:59 Hrs.** for above tender
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person :-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No. 8793505100
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Manoj V. Borse)**
**Executive Engineer (I/c)**
**EHV (O&M) Dn. Mahad**

# निवडक

## रामकृष्ण म्हात्रे कुटुंबियांचे चित्रलेखा पाटील यांच्याकडून सांत्वन

**वाघ्रण :** अलिबाग तालुक्यातील सातघर गावचे ज्येष्ठ नागरीक आणि रायगड जिल्हा परिषदेचे सेवा निवृत्त शिक्षण विभागाचे अधिकारी रामकृष्ण म्हात्रे यांचे रविवारी (दि.७) निधन झाले. शेकापच्या महाराष्ट्र राज्याच्या प्रवक्त्या आणि सोशल मिडीयाच्या सेलच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील यांनी रविवारी (दि.१४) म्हात्रे यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. चित्रलेखा पाटील यांनी रामकृष्ण म्हात्रे यांच्या पत्नी कवीता म्हात्रे, मुलगा प्रतिक म्हात्रे, सुन पूजा म्हात्रे व नात यांच्यासह नातेवाईकांचे सांत्वन केले. यावेळी शेकापचे तालुका शेतकरी समिती अध्यक्ष अनिल पाटील, पेढांबे ग्रामपंचायत सदस्य कैलास म्हात्रे, रुपेश पाटील, अनिल पाटील, धनंजय पाटील, प्रकाश पाटील आदींसह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## कुत्र्याच्या हल्ल्यात घोरपड जखमी

**पाताळगंगा :** खोपोली शहरातील इंडस्ट्रियल इस्टेट परिसरात विनी इंजिनिअरिंगच्या आवारात मंगळवारी (दि.१६) सकाळी लॅब्रेडोर जातीच्या पाळीव कुत्र्याने घोरपडीवर हल्ला केला. त्या



कुत्र्याने घोरपडीला चावा घेऊन जखमी केले. प्रतिकार म्हणून घोरपडीनेही आपल्या शेपटीने कुत्र्यावर हल्ला केला. दरम्यान, घोरपड अर्धमेली झाल्यावर कुत्रा शांत झाला. यावेळी उपस्थित निलेश कुदळे यांनी त्या कुत्र्याला आवरले आणि जखमी घोरपडीला शिताफीने ताब्यात घेतले. त्यांनी तत्काळ हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांच्याशी संपर्क साधून मदत मागितली. गुरुनाथ साठेलकर यांनी प्रवीण शेंद्रे यांच्या मदतीने घोरपडीवर प्राथमिक उपचार केले. काही तासांच्या विश्रांतीनंतर ती पुन्हा ठणठणीत झाली आणि अखेरीस वनक्षेत्रात तिला सोडण्यात आले.


## शेणवली येथून तरुण बेपत्ता

**तळा :** तालुक्यातील शेणवली येथून ३५ वर्षीय तरुण बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. विक्रम विठ्ठल शिवडे असे बेपत्ता तरूणाचे नाव आहे. तो २७ ऑगस्ट रोजी आपल्या राहत्या



घरातून कोणालाही न सांगता निघून गेला होता. तो परत घरी आला नाही म्हणून त्याच्या घरच्यांनी त्याचा शोध घेतला. मात्र, तो कुठेही सापडला नाही. त्यामुळे तो हरवला असल्याची तक्रार तळा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या तरुणाची उंची ५ फूट ५ इंच, रंग सावळा, पांढऱ्या रंगाचा फुल हाताचा शर्ट व पॅन्ट, पायात काळ्या रंगाची चप्पल, दोन्ही हातांवर व पायांवर जुन्या जखमा यासह हा तरुण मनोरूग्ण असून त्याला बोलता येत नाही. तरूणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळा पोलीस ठाण्यात कळवावे, असे आवाहन तळा पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## बेलापूर रेल्वेस्टेशन रस्त्यावरील भिंत धोकादायक



**नवी मुंबई :** सोमवारी पडलेल्या मुसळधार पावसाने अर्बन हट व बेलापूर रेल्वेस्टेशन मधील रस्त्यावरील अर्बन हटची भिंत कोसळण्याची घटना घडली आहे. या मार्गाचा वापर दररोज हजारो रेल्वे प्रवासी करत असतात. ही भिंत अत्यंत धोकादायक अवस्थेत असून ती पुर्णपणे कोसळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या भिंतीजवळून विद्यार्थ्यांसह स्थानिक नागरिक, महिला व ज्येष्ठ नागरिकांची नियमित ये-जा होते. त्यामुळे कोणत्याही क्षणी मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हा रस्ता नवी मुंबईतील अत्यंत महत्वाचा दुवा असल्याने या ठिकाणी तातडीने आवश्यक दुरुस्तीचे काम हाती घेणे अत्यावश्यक आहे. विलंब झाल्यास सार्वजनिक सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होईल. त्यामुळे या धोकादायक भिंतीची तात्काळ तपासणी करण्यात यावी. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने भिंतीची दुरुस्ती तातडीने करण्यात यावी. तसेच, आवश्यक त्या उपाययोजना करून भविष्यात अशा घटना होऊ नयेत यासाठी कायमस्वरूपी दुरुस्तीचे नियोजन करण्यात यावे, अशी मागणी नवी मुंबईच्या सजग नागरिक मंचातर्फे सिडकोचे मुख्य अभियंता यांच्याकडे करण्यात आली आहे.

## माथेरानमधील धरणे तुडुंब भरली

**माथेरान :** रायगड जिल्ह्यातील गिरीस्थान आणि घनदाट जंगल असलेल्या माथेरानमध्ये पावसाने ५,४८४ मिलिमीटरचा टप्पा गाठला आहे. त्यामुळे माथेरान पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली सर्व धरणे तुडुंब भरली आहेत. माथेरान टापू आणि परिसरात सुमारे ७०० हेक्टर मध्ये घनदाट जंगल असल्यामुळे येथे जोरदार पाऊस पडतो.



माथेरानला दरवर्षी चार महिन्यात सरासरी ५ हजार मिलिमीटर पेक्षाही जास्त पाऊस पडतो. यंदाच्या वर्षी देखील सोमवार दि.१६ सप्टेंबरपर्यंत ५,४८४ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. माथेरानच्या डोंगर माथ्यावर बरसणाऱ्या मुसळधार पावसामुळे या ठिकाणी डोंगरपायथ्याशी असलेली तिन्ही धरणे आता तुडुंब भरली आहेत. त्यामुळे मोठ्या शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असून पर्यटनात वृद्धी आल्याचे दिसून आले आहे.

## खालापूर पोलिसांची मोठी कारवाई

# लाखोंचा गुटखा जप्त

### पोलिसांच्या धाडसी कामगिरीचे कौतूक



**| खोपोली | प्रतिनिधी |**

**कागदावर गुटखाबंदी असली तरी राज्याच्या कानाकोपऱ्यात गुटखा राजरोस विक्री होताना दिसत आहे. राज्य शासनाने १३ वर्षांपूर्वी गुटख्यावर बंदी घातली आहे. तरी देखील गुटखा तस्करांनी अवैधरित्या गटखा तस्करी सुरू ठेवली आहे. अशातच पुणे-मुंबई महामार्गावरून एका टेंम्पोमधून होणाऱ्या विमलपान मसाला व गुटख्याची होणारी तस्करी उघडकीस आली आहे. खालापुर पोलिसांनी सावरोली टोलनाका येथे सापळा रचून धडक कारवाई करत हा प्रकार उघडकीस आणला आहे. या कारवाईत टेम्पोसह साडेसोळा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

राज्यातील युवा पिढी मोठ्या प्रमाणात गुटखा खाण्याच्या आहारी जात आहे. त्याचप्रमाणे गुटख्याच्या सेवनामुळे फुफ्फुस, तोंड आणि आतड्यांच्या कर्करोगाचे वाढते प्रमाण विचारातत घेऊन तत्कालीन सरकारने २० जुलै २०१२ रोजी राज्यात गुटखाबंदी लागू केली होती. असे असतानाही छुप्या पद्धतीने राजरोसपणे गुटखा विक्री होत आहे. त्यामुळे गुटखाबंदीवर ठोस कारवाई व्हावी अशी मागणी होत असताना पुन्हा एकदा स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड व खालापूर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना १३ सप्टेंबर रोजी विमलपान मसाला व गुटखा याची अवैध वाहतुक सावरोली टोलनाका येथुन मुंबई-पुणे जुन्या महामागनि एका टेम्पोतून होणार असल्याची माहिती मिळाली. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांनी खालापूरचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या पथकाला प्राचारण केले. दरम्यान, एक छोटा हत्ती टेम्पो सावरोली कनेक्टर रोडकडुन खालापुर बाजुकडे येताना दिसला. त्यावेळी पोलीसांनी त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु, टेम्पोचालक गाडी थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळून गेला. या टेम्पोची तपासणी केली आसता त्यात पांढऱ्या व खाकी रंगाच्या बारदानच्या गोणींमध्ये विमल पानमसाला व गुटखा असल्याचे निर्दशनास आले. यामध्ये ५२ हजार ८०० रुपये किमतीचा तंबाखु असलेल्या सफेद रंगाच्या १२ नायलॉनच्या गोणी, ९ हजार रुपयाचे खाकी रंगाच्या बारदानाच्या ३ लहान गोणी, १० लाख ८९ हजार रुपयाचे केसरयुक्त विमल पानमसाला असलेल्या खाकी रंगाच्या बारदानच्या २५ मोठ्या गोणी व वाहतुकीसाठी वापरलेला ४ लाख रुपयाचा छोटा हत्ती टेम्पो असा एकूण १६ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यामुळे खालापूर पोलीस व रायगड गुन्हे अन्वेषण शाखाच्या या धाडसी कामगिरीचे कौतुक होत आहे.

> **कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे खालापूर पोलीस ठाणे हद्दीत सुरू असल्याचे आढळून आल्यास जनतेने खालापूर पोलीस ठाण्यास संपर्क करून कळवावे.**
> **- सचिन पवार, पोलीस निरीक्षक, खालापूर**

ही कारवाई रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवतरे, खालापुर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहूल, उप पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे, खालापूरचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक शामल पाटील, सहाय्यक फौजदार मोहन भालेराव, संदीप पाटील, बाळकृष्ण जाधव, आशिष पाटील या पथकाने केली आहे.



## उरण तालुका गॅसने भरलेला फुगा

**| उरण | प्रतिनिधी |**

मुंबईजवळ वसलेला उरण तालुका आता भोपाळच्या पूर्वसूचक स्थितीत आहे. या ठिकाणी ओएनजीसी, बीपीसीएल, वीज प्रकल्प आणि अनधिकृत यार्डमध्ये हजारो टन ज्वलनशील रसायने व तेल साठवले जात आहे. या साठ्यांवर नजर ठेवणारे अधिकारी, तहसीलदार, स्थानिक सरपंच, ग्रामसेवक आणि राजकीय नेते सगळे हातात हात घालून बसले आहेत. त्यामुळे उरण तालुका हा गॅसने भरलेला फुगा असून पैसा, ठेके, दलाली याच्यामध्ये नागरिकांचा जीव किती महत्त्वाचा आहे, हे त्यांना दिसत नसल्याची चर्चा उरणकरांमध्ये रंगत आहे.

उरण हे आज गॅसचा फुगा बनलेले शहर आहे. या ठिकाणी लाखो लिटर तेल, टनावारी वायू व रासायनिक पदार्थ साठवले जात आहेत. तसेच उरणमध्ये असंख्य अनधिकृत यार्ड असून येथे सुरक्षा उपाययोजना देखील अल्पस्तरीय आहेत. जर अशीच बेफिकिरी सुरू राहिली, तर भोपाळपेक्षाही महाभयंकर मानवी संहारक दुर्घटना घडेल, अशी भीती जाणकारांकडून वर्तविली जात आहे. कारण या आधी २०१९ मधील गॅसगळतीत चार कामगार जिवंत जळून गेले होते. तसेच, सीआयएसएफचे जवान मरण पावले होते. परंतु, त्यावेळी एका अधिकाऱ्यावरही कारवाई झाली नाही. त्यानंतर ६ सप्टेंबर रोजी आग लागून दोन कामगार जखमी झाले होते. त्यानंतर पुन्हा ८ सप्टेंबर रोजी आग लागली होती. त्यातच काही दिवसांपूर्वी एका कंत्राटी कामगाराचा मृत्यू देखील झाला होता.

यावेळी उरणकरांनी ठाम इशारा दिला आहे की, मस्तवाल अधिकाऱ्यांना तुरुंगात टाका, हलगर्जी ठेकेदारांचे परवाने रद्द करा, गप्प बसणाऱ्या ग्रामपंचायती व राजकीय नेत्यांचा मुखवटा उघडा पाडा. जर हे झाले नाही, तर उरण भोपाळपेक्षा भयंकर नरसंहाराचा सामना करावा लागेल. आज उरणची घटना फक्त अपघात नाही, हा जनता आणि प्रशासनावरील विश्वासघात आहे. त्यामुळे आता उरणकरांचा रोष उग्र होईल, असा इशारा देण्यात येत आहे.

## खोपोलीत भाजपला मोठा धक्का

**| खोपोली | प्रतिनिधी |**

अगामी खोपोली नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपला मोठा धक्का बसला आहे. भाजप उत्तर जिल्हा उपाध्यक्ष अश्विनी पाटील आणि खोपोली शहराध्यक्ष राहुल जाधव यांनी पदांसह पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. १५ सप्टेंबर रोजी या दोन्ही नेत्यांनी जिल्हाध्यक्षांकडे आपले राजीनामे सुपूर्द केले असून, त्यामुळे खोपोली शहर भाजपमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

या दोन्ही पदाधिकाऱ्यांनी राजीनाम्यात नमूद केले आहे की, पक्षात प्रवेश घेतल्यानंतर त्यांनी प्रचंड मेहनतीने संघटन उभारले. मात्र, वैयक्तिक कारणास्तव पुढे काम करणे शक्य नसल्याने राजीनामा दिला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, राजीनाम्यांमागील खरी कारणे ही खोपोली भाजपमधील अंतर्गत गटबाजी आणि नाराजी असल्याची चर्चा आहे. त्यामुळे भाजपच्या आगामी रणनीतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेला हा धक्का खोपोलीतील भाजपच्या ताकदीला धक्का देणारा ठरण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे. तसेच, आणखी दोन माजी नगरसेवक देखील पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे.

## प्रकल्पग्रस्तांना प्लॉट वाटप सुरू

**| उरण | प्रतिनिधी |**

वर्षानुवर्षे वाट पाहणाऱ्या जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांसाठी अखेर चांगली बातमी आली आहे. साडेबारा टक्के भूखंडांचा ताबा २०२६च्या मार्च-एप्रिलपासून मिळणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. नुकत्याच झालेल्या जेएनपीटी-सिडको प्रकल्पग्रस्तांच्या संयुक्त बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. सिडको अधिकाऱ्यांनी सांगितले की, सुमारे ६५% विकासकामे पूर्ण झाली असून, उर्वरित कामे पुढील काही महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. पावसाळ्यामुळे गती मंदावली असली तरी आता वाटपाची दिशा निश्चित झाली आहे.

## ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांचा स्तुत्य उपक्रम

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



अलिबाग तालुक्याती प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय व तालुका वाचनालयाच्या ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांनी एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे. त्यांनी लहान मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी अलिबाग नगरपरिषदेच्या शाळांमध्ये जाऊन तेथील मुलांना उपयोगी व वाचनीय अशी पुस्तके देऊन त्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले आहे. प्रार्थनेच्या वेळी व इतर रिकाम्यावेळी मुलांनी ती पुस्तके वाचावीत व शिक्षकांनी त्या पुस्तकावर आधारित प्रश्न विचारून मुलांचे ज्ञान वाढवावे, असेही त्यांनी सांगितले.

ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांनी नगरपरिषद शाळा क्रमांक २, ३ आणि ५, तसेच राजीप शाळा तळ-कावीर येथील विद्यार्थ्यांना महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, लोकमान्य टिळक, बाबासाहेब आंबेडकर, अब्दुल कलाम, झाशीची राणी, बिरबलाच्या गोष्टी, संत गाडगे महाराज अशी अनेक वाचनीय पुस्तके भेट दिली. यावेळी ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांच्यासह प्राध्यापिका चंद्रकला वर्तक, ज्योती घरत व वैशाली ठाकूर या शिक्षिका उपस्थित होत्या.



## ‘दिघेंचा वारसा खोपोली गावाने जपला’

**| खोपोली | प्रतिनिधी |**

मराठी साहित्यातील पाच लेखकांचे साहित्य वाचून लेखक व्हावे असे वाटत होते. त्यामधील र.वा. दिघे थोर साहित्यिक आहेत. आदिवासी आणि भटक्यांवर कातोड्यांची कहाणी पहिल्यांदा मराठीत र.वा. दिघे यांनी लिहिली आहे. म्हणूनच अखिल भारतीय साहित्य संम्मेलनाचे अध्यक्षपद मिळाल्यानंतर गुरुजनांच्या उंबरठ्यावर माथा टेकवून नव्या कार्यास प्रारंभ करीत आहे. र.वा.दिघे स्मारक पाहिल्यावर त्यांच्या मृत्युनंतरही खोपोली गावाने वारसा जपल्याने महाराष्ट्रातील प्रत्येक कवि व लेखकाला अस गाव मिळावे, असे प्रतिपादन नवनिर्वाचित अखिल भारतीय साहित्य संम्मेलनाचे अध्यक्षपद विश्वास पाटील यांनी केले. मंगळवार (दि.१६) विश्वास पाटील यांनी र.वा.दिघे यांच्या घरी भेट दिली. त्यानंतर खोपोली नगरपालिकेने र.वा. दिघे यांच्या नावाने बांधलेल्या स्मारकाला भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्याधिकारी रणजीत पवार, लेखिका रेखा कोरे, उल्हासराव देशमुख, बी.एल.पाटील, तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रशांत माने, डॉ.सुभाष कटकदौंड, नरेंद्र हार्डीकर, भाई ओव्हाळ यांच्यासह कोमसपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## वारसांना मिळणार वारसहक्काची नोकरी

**| उरण | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी संघर्ष समितीच्या तीव्र लढ्यानंतर अखेर राज्यातील हजारो सफाई कामगारांच्या वारसांना वारसाहक्काने नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांनी १० सप्टेंबर रोजी आदेश निर्गमित करून सर्व नगरपरिषद व नगरपंचायतींना नियुक्ती करण्याचे निर्देश दिले आहेत. संघर्ष समितीचे नेते डॉ. डी.एल. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली, ॲड. सुरेश ठाकूर, संतोष पवार, अनिल जाधव यांनी न्यायालयीन पातळीवर सातत्याने लढा दिला. अखेर ८ जानेवारी रोजी स्थगिती उठवल्यानंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने आदेश काढला होता.

## आगरी-कोळी संग्रहालयाचा वनवास संपेना

**| उरण | प्रतिनिधी |**

सिडकोने नवी मुंबई शहर हे आगरी-कोळी समाजाच्या जमिनीवर उभारले आहे. या समाजाच्या संस्कृतीचे जतन व्हावे, परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने नेरुळ सेक्टर-२४ येथे आगरी-कोळी संस्कृती भवन उभारण्यात आले. या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर समाजाच्या संस्कृतीचा वारसा जपणारे संग्रहालय उभारण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, लोकार्पणाला तब्बल १४ वर्षे उलटूनही संग्रहालय सुरू झालेले नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

२०११ मध्ये आगरी-कोळी संस्कृती भवन इमारतीचे लोकार्पण झाले. समाजातील विवाहसोहळे व विविध कार्यक्रमांसाठी दुसऱ्या-तिसऱ्या मजल्यावर सभागृहे उपलब्ध करून दिली असून पहिल्या मजल्यावरचे संग्रहालय आजही कागदोपत्रीच राहिले आहे. त्यामुळे १४ वर्षे उलटली तरी या संग्रहालयाचा मुहूर्त लागत नाही, अशी खंत समाजबांधव व प्रकल्पग्रस्त व्यक्त करीत आहेत. दरम्यान, इमारतीच्या सभागृहातील खुर्च्या मोडकळीस आल्याने त्यासाठी नवीन खुर्च्यांच्या निविदा मागविल्या असल्याचे सिडकोचे सहायक कार्यकारी अभियंता गोकुळ राठोड यांनी सांगितले. परंतु, संग्रहालयाबाबत मात्र अद्याप ठोस पावले उचलली गेली नाहीत. पहिल्या मजल्यावरील संग्रहालय एक वर्षाच्या आत सुरू झाले नाही, तर सिडकोविरोधात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा रायगड जिल्हाध्यक्ष नामदेव भगत यांनी दिला आहे.

### तहसिल कार्यालयायावतीने विविध उपक्रम | १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा

# शासनाच्या ऐतिहासिक निर्णयाची अंमलबजावणी

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

**छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनी दि. १७ सप्टेंबरपासून ते महात्मा गांधी यांच्या जन्मदिनी दि. २ ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. या कालावधीत सुधागड-पालीच्या तहसिल कार्यालयच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येणार असून, तहसीलदार उत्तम कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण तीन टप्प्यांत ही अंमलबजावणी होणार आहे.**

छत्रपती शिवाजी महारानस्व अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते २ आक्टोबर पर्यंत सेवा पधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्यातील १७ ते २२ सप्टेंबर दरम्यानच्या पहिल्या टप्प्यात सुधागड तालुक्यातील सर्व गावांमध्ये ग्राम महसूल अधिकारी, ग्राम विकास अधिकारी, कोतवाल, पोलीस पाटील आणि ग्रामस्थ यांच्या सहभागाने शिवारफेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक गावातील पाणंद रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून यादी तयार केली जाणर आहे. ही यादी ग्रामसभेत



वाचन करून मंजुरी घेण्यात येणार असून, त्यानंतर रस्त्यांची मोजणीसाठी उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे प्रस्ताव पाठवला जाणार आहे. रस्त्यांचे सिमांकन करून दुतर्फा वृक्षारोपण करण्यात येणार आहे. तसेच, सर्व रस्त्यांची एकत्रित नोंद गाव नमुना क्रमांक १ (फ) मध्ये समाविष्ट केली जाणार आहे.

> **सेवा पंधरवड्याचा उद्देश म्हणजे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सशक्त करणे हा आहे. प्रत्येक उपक्रम हा जनतेच्या हितासाठी असून, सर्व विभागांनी समर्पित भावनेने काम करावे.**
> **- उत्तम कुंभार, तहसीलदार, सुधागड-पाली**

२३ ते २७ सप्टेंबर दरम्यानच्या दुसऱ्या टप्प्यात १ जानेवारी २०११ पूर्वीच्या शासकीय जमिनीवरील पात्र अतिक्रमणांचे नियमबद्धीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांना अधिकृत हक्क प्राप्त होणार असून, त्यांच्या मालकीच्या दाव्यांना कायदेशीर आधार मिळणार आहे.

त्यांनतर २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यानच्या तिसऱ्या टप्प्यात आदिवासी बांधवांच्या पाल्यांना जन्म दाखले आदेश वाटप करण्यात येणार आहेत. संजय गांधी निराधार योजनेतील पात्र लाभार्थ्यांची थेट लाभ हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. ‘सैनिक हो तुमच्यासाठी’ उपक्रमांतर्गत आजी-माजी सैनिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांचे निराकरण केले जाणार आहे. तसेच, आयुष्यमान भारत कार्ड शिबीर आयोजित करून नागरिकांना आरोग्य सुरक्षा प्रदान केल्या जाणार आहेत.

या उपक्रमांमुळे सुधागड तालुक्यातील ग्रामस्थांना वास्तव सेवा, कायदेशीर हक्क आणि सामाजिक सुरक्षा यांचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे तहसील कार्यालयाने सर्व नागरिकांना या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले आहे. या सेवा पंधरवड्याचा फायदा सर्वसामान्य जनतेला होणार आहे असे तहसिलदार उत्तम कुंभार म्हणाले.

# विश्वासाचे पानिपत

पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेले सखाराम गटणे हे पात्र सर्वपरिचित आहे. पुलंच्या आवाजात अनेकांनी ही कथा ऐकलीही असेल. लेखकांकडे एखाद्या देवाप्रमाणे पाहणारा, त्यांची भक्ती करणारा व त्यांच्या लेखनातील तत्वे जगण्यात लावू पाहणाऱ्या गटणेची व्यक्तिरेखा पुलंनी विनोदाच्या अंगाने रेखाटली आहे. हा गटणे कथेच्या शेवटी स्वप्नाळू जगातून बाहेर येतो व लग्न करून रांकेला लागतो. यातला विनोदाचा भाग सोडला तरी, साहित्य व साहित्यिक यांच्याविषयी आजही असंख्य वाचकांची भावना ही अशीच भक्तिभावाची असते. रामायण मालिकेत रामाचे काम करणाऱ्याच्या पाया पडणाऱ्यांचा आपला समाज आहे. त्यामुळे साहित्यिक, नट, नाटककार, कलावंत यांची जबाबदारी प्रचंड वाढत असते. आपल्या खासगी आयुष्यात किमान नैतिकतेने वागणे हे त्यांच्याकडून अपेक्षित असते. अशाच नैतिकतेची एक परीक्षा यंदाच्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने होऊ घातली आहे. मधल्या काळात या संमेलनांच्या अध्यक्षपदी असे काही लोक येऊन गेले की हे कोण व यांनी काय लिहिलेय याचा शोध घेण्याची वेळ बहुसंख्य वाचकांवर आली. यंदाच्या साताऱ्याच्या संमेलनासाठी कादंबरीकार विश्वास पाटील यांची निवड झाली आहे. लेखक म्हणून ते चांगलेच लोकप्रिय आहेत. किंबहुना त्यांनी इतके लेखन करून ठेवले आहे की ते एकाच वेळी दोन्ही हातांनी लिहितात की काय असा प्रश्न वाचकांना पडावा. अशा एका दमदार लेखकाची अध्यक्षपदी निवड झाली हे चांगलेच झाले. कोल्हापूरच्या शेतकरी कुटुंबातून वर आलेल्या लेखकाने कारकीर्दीच्या आरंभीच झाडाझडतीसारखी कादंबरी लिहून धरणग्रस्त वा प्रकल्पग्रस्तांच्या दुःखांचे भेदक चित्रण केले. पानिपतच्या लढाईवरची त्यांची कादंबरी तर खपाचे सर्व उच्चांक मोडून गेली. इतकी की त्यांची ओळख आजही पानिपतकार म्हणूनच करुन दिली जाते. शिवाजी व संभाजीमहाराजांवरही त्यांनी लेखन केले. सुभाषचंद्र बोस यांच्यावरच्या नेताजी या कादंबरीसाठी त्यांनी कोलकाता व जपान इथे जाऊन संदर्भ धुंडाळले. किंबहुना कोणत्याही कादंबरीसाठी ते घेत असलेली मेहनत प्रशंसनीय आहे. सहकार क्षेत्रावर तसेच तमासगिरांच्या जीवनावरही त्यांनी असेच लेखन केले आहे. साताऱ्याच्या संमेलनाला त्याच मातीतला लेखक लाभणे हा योग चांगलाच म्हणावा लागेल.

## भ्रष्टाचाराचे आरोप

मात्र पाटील यांच्या व्यक्तिमत्वाची दुसरीही एक बाजू आहे. पाटील हे बराच काळ उपजिल्हाधिकारी होते व कारकीर्दीच्या शेवटी त्यांना आयएएस श्रेणीत बढती मिळाली. ते मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी झाले. मुंबईतील झोपड्यांचे पुनर्वसन किंवा एसआरए म्हणजे बिल्डर, सरकारी अधिकारी व नेते यांचे खायचे कुरण झाले आहे. यात सतत भ्रष्टाचाराचे आरोप होतात. पण सगळेच जण सामील असल्याने त्यांची तड लागत नाही. एरवी शिवाजीमहाराज वगैरेंवर लिहिणारे लेखक पाटील या प्राधिकरणात गेल्याने भ्रष्टाचाराला आळा बसेल व काहीतरी शिस्त लागेल असे वाटले होते. पण प्रत्यक्षात उलटेच झाले. निवृत्तीला काही काळ बाकी असताना पाटील यांनी कादंबऱ्या लिहाव्या तशा झपाट्याने बिल्डरांच्या फायली संमत केल्या. त्यांच्याविषयी ओरड झाली व बातम्या आल्या. त्यामुळे देवेंद्र फडणवीसांना चौकशीचे आदेश द्यावे लागले. त्यात ३३ प्रकरणांच्या फाईल संमत करताना घोटाळा झाल्याचे आढळले व ही प्रकरणे रद्द करण्यात आली. मात्र हे घोटाळे किंवा अनियमितता करणाऱ्या पाटील यांच्यावर काहीच कारवाई झाली नाही. त्यानंतर राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव संजयकुमार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. आर्थिक गुन्हे शाखेचीही मदत घेण्यात आली. मात्र नंतर ही चौकशी का व कुठे गडप झाली हे कळलेले नाही. पाटील हे मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी असताना त्यांच्या पत्नीला जुहूच्या झोपडपट्टी विकास योजनेतून अलिशान घर मिळाले असाही एक आरोप आहे. या योजनेत पत्नीला भागीदार बनवण्यात आले होते. माजी मुख्य सचिव सीताराम कुंटे यांनी हे प्रकरण बाहेर काढले होते. म्हणजे त्यात काही ना काही तथ्य होते. मात्र याही प्रकरणाची तड लागलेली नाही. पाटील हे ठाण्याचे उपविभागीय अधिकारी असताना येऊर इथल्या बेकायदा बंगलेवाल्यांवर कारवाई न करता त्यांना संरक्षण देण्याचे काम पाटील यांनी केले असा आरोप झाला होता.

## खुलासा हवा

या आरोपांची तड लागून पाटील हे निर्दोष आहेत असे निःसंदिग्धपणे बाहेर आले असते तर मराठी वाचकांना आनंदच झाला असता. पण दुर्दैवाने ही सर्व प्रकरणे एक तर गुंडाळण्यात आली आहेत किंवा त्यांच्याबाबतचे सत्य नीटपणे बाहेर येऊ दिले जात नाही. आता संमेलनाध्यक्षपदाच्या निमित्ताने तरी पाटील आणि सरकार या दोहोंनीही याचा खुलासा करतील अशी अपेक्षा आहे. पाटील हे गोष्टी फार खुलवून सांगतात. ते चांगले आख्यानकारच आहेत. त्यामुळे सातारा अधिवेशनात अध्यक्ष म्हणून त्यांच्या रसवंतीला कशी बहार येईल याची कोणीही कल्पना करू शकेल. पण एकीकडे शिवाजीमहाराजांच्या आदर्शांचे पोवाडे गाणाऱ्या या पाटलांवर पदाचा दुरुपयोग केल्याचा आरोप अधांतरीच राहावा हे योग्य दिसणार नाही. अर्थात, साहित्य संमेलन भरवणाऱ्या संस्था, आयोजक व वाचक यांचीही यात जबाबदारी आहे. त्यांनीही पाटील यांच्याकडे याबाबत विचारणा करायला हवी. आज एकीकडे सदाचाराच्या आणि नीतीच्या गप्पा आणि दुसरीकडे भ्रष्टाचारात पाचही बोटे बुडालेली अशा व्यक्ती जीवनाच्या सर्व क्षेत्रात आहेत. राजकारण, प्रशासन, पोलिस, न्याययंत्रणा कोणीही यातून सुटलेले नाही. लेखक या व्यक्तीबाबत समाजाच्या विशिष्ट कल्पना असतात. त्यातही जो लेखक सुभाषचंद्र बोस, संभाजी अशा ऐतिहासिक पात्रांविषयी इतक्या भरभरून लिहितो आहे तो स्वतः निष्कलंक असणारच अशी लोकांची श्रद्धा असते. श्रद्धेला तडा जाऊ देणे म्हणजे समाजातील सर्व चांगुलपणा, मूल्ये यांचा खून करणे होय. सामान्य लोकांच्या विश्वासावरच जग चालत असते. पण त्यांचे पानिपत होणे म्हणजे समाज ऱ्हासाकडे जाणे. पानिपतकारांच्या बाबतीत ते होऊ नये. एकेकाळी मराठी साहित्यिक हे सर्व समाजाच्या आदराचे व कुतूहलाचे विषय होते. विशेषतः मुंबई-पुण्याच्या बाहेर लेखक पाहायला वा ऐकायला मिळणे हे त्यावेळी दुर्मिळ होते. त्यामुळे साहित्य संमेलने म्हणजे लेखकांना भेटण्याची पर्वणी असे वाचकांना वाटे. इंटरनेटच्या प्रसारामुळे ते आकर्षण कमी झाले असले तरी संपलेले नाही. मात्र साहित्य संमेलने म्हणजे जत्रा किंवा चोरांचा बाजार असे स्वरुप आले आहे. त्या त्या भागात साखर कारखाने किंवा इंजिनिअरिंग, मेडिकल कॉलेजांच्या जिवावर मातबर होऊन बसलेला पुढारी या संमेलनांचा स्वागताध्यक्ष होतो. उद्घाटनाला अमिताभ बच्चनपासून कोणीही सेलिब्रिटी आणला जातो. सरकार दोन ते तीन कोटींचे अनुदान देते. त्या बदल्यात, मुख्यमंत्र्यांसह तमाम मंत्री हजेरी लावून जातात. त्यामुळे गर्दी होते व प्रसिद्धीही भरपूर मिळते. यंदाही हेच होईल. पण वाचकांच्या विश्वासाचे अगदीच पानिपत होऊ नये.

विचार

# फॅशनमुळे पर्यावरणाची हानी

***'वापरा आणि फेकून द्या' ही मानसिकता दैनंदिन वस्तू असोत किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे; सर्वांबाबत सारखीच आढळते. वेगाने बदलणाऱ्या फॅशनमुळे कचरा आणि निरुपयोगी वस्तूंचा कचरा वाढत आहे. यामुळे केवळ पृथ्वीच नाही, तर समुद्रही प्रदूषित होत आहे. हा संबंध समजून घेऊन फॅशनच्या नावाखाली सतत नवनवीन कपडे विकत घेण्याच्या वृत्तीचा विचार व्हायला हवा.***



मिलिंद बेंडाळे

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाने (यूएनईपी) २०२३ मध्ये म्हटले होते, की फॅशन उद्योग जागतिक कार्बन उत्सर्जनात दर वर्षी सुमारे दहा टक्के योगदान देत आहे. हे प्रमाण आंतरराष्ट्रीय उड्डाणे आणि सागरी शिपिंगच्या एकत्रित उत्सर्जनापेक्षा जास्त आहे. हा ट्रेंड असाच चालू राहिल्यास २०३० पर्यंत उद्योगातील हरितगृह वायू उत्सर्जन ५० टक्क्यांपेक्षा जास्त वाढण्याची शक्यता आहे. नूतनीकरणीय संसाधनांचा ऱ्हास, ऊर्जा आणि पाण्याचा वापर कमी करणे आणि कार्बन आणि हरितगृह वायू उत्सर्जनामुळे पर्यावरणावर परिणाम होतो. फॅशन उद्योगातील सर्वात मोठ्या गुन्हेगारांमध्ये या फॅशन कंपन्या आहेत, ज्या कमी किमतीची उत्पादने बनवतात. त्यांचे कार्बन फूटप्रिंट खूप वाईट असते. कारण ग्राहक दर हंगामात नवीन कपडे खरेदी करण्यास तयार असतात. याला 'जलद फॅशन' म्हणता येते. जलद फॅशन हे एक व्यवसाय मॉडेल आहे. ते ग्राहकांना उच्च दर्जाच्या किंवा अधिक महागड्या ब्रँडपेक्षा स्वस्त आणि जलद कपडे प्रदान करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्थांचा वापर करते. याचा अर्थ ब्रँड एक्सपोजर आणि मोठ्या प्रमाणात उत्पादनाद्वारे मोठ्या ग्राहक आधारापर्यंत पोहोचणे. याचा दुसरा अर्थ असा की परवडणारे कपडे प्रभावशाली आणि डिझायनर ट्रेंडशी जुळवून घेतात. कार्बनकेंद्रित उत्पादन चक्रांद्वारे भरपूर कापड कचरा आणि कार्बन उत्सर्जन तसेच नवीनतम शैलीसाठी कपडे टाकून देण्याची संस्कृती रुढ होत आहे. हा ट्रेंड असाच सुरू राहिल्यास २०५० पर्यंत फॅशन उद्योगाचा जागतिक कार्बन उत्सर्जनात २६ टक्के वाटा असेल, असा अंदाज आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या 'युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज'च्या अहवालात म्हटले आहे की, दर वर्षी फॅशन उद्योग उत्पादन गरजा पूर्ण करण्यासाठी ९३ अब्ज घनमीटर पाणी वापरतो. ते पाच दशलक्ष लोकांना वर्षभर पुरू शकेल. 'क्वांटिस इंटरनॅशनल'च्या २०१८ च्या अहवालानुसार, उद्योग उत्सर्जनाचे सर्वात मोठे चालक म्हणजे रंगवणे आणि फिनिशिंग (३६ टक्के), धागा तयार करणे (२८ टक्के) आणि फायबर उत्पादन (१५ टक्के). कपडे धुण्यामुळेदेखील दर वर्षी पाच लाख टन मायक्रोफायबर समुद्रात सोडले जातात. ते सुमारे ५० अब्ज प्लास्टिक बाटल्यांइतके आहे. 'फास्ट फॅशन लाइफसायकल' आणि पुरवठा साखळीचे काही भाग इतरांपेक्षा जास्त ऊर्जा-केंद्रित किंवा प्रदूषणकारी आहेत. 'चेंजिंग मार्केट्स फाउंडेशन'च्या २०२१ च्या अहवालात कंपन्या उत्पादन खर्च कमी ठेवण्यासाठी पॉलिस्टरसारख्या स्वस्त साहित्याचा वापर करतात. पॉलिस्टर हा पेट्रोलियमपासून बनवलेला एक कृत्रिम पदार्थ आहे. त्याचे विघटन होण्यास सुमारे दोनशे वर्षे लागतात आणि कापसाच्या उत्पादनापेक्षा सुमारे तिप्पट कार्बन उत्सर्जन होते.

कापसापासून बनवण्यात येणाऱ्या टी-शर्टच्या उत्पादनात २.१ किलोग्रॅम कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन होते, तर पॉलिस्टर टी-शर्ट उत्पादनात ५.५ किलोग्रॅम कार्बन डायऑक्साइड उत्सर्जित होतो. कंबोडिया, बांगलादेश, चीन आणि भारत यासारख्या विकसनशील देशांमध्ये अनेक मोठे कापड उत्पादक आहेत. यापैकी ६० टक्के कपडे फॅशन उद्योगात वापरले जातात. त्याचे उत्पादक सामान्यतः या चार देशांमध्ये आढळतात. यातील बरीच संयंत्रे कोळशाच्या ऊर्जेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. यामुळे ग्राहकांना पाठवल्या जाणाऱ्या प्रत्येक कपड्याचा कार्बन फूटप्रिंट लक्षणीयरीत्या वाढतो. यामध्ये या उत्पादन कारखान्यांचा सामाजिक खर्च समाविष्ट नाही. त्यांना 'स्वेटशॉप्स' म्हटले जाते. या देशांमध्ये स्वस्त कामगार हे अनेक मोठ्या फॅशन कंपन्यांना उत्पादनासाठी उपलब्ध असतात. त्यामुळे उत्पादन खर्च कमी राहतो. या कारखान्यातील कामगार अनेकदा स्वतःच शाश्वत जीवन जगण्यासाठी संघर्ष करतात. फॅशन उद्योग कारखान्यातील दोन टक्क्यांपेक्षा कमी कामगार जगण्यासाठी पुरेसे पैसे कमवतात. या उत्पादन केंद्रांचे स्थान विकसनशील देशांमध्ये तर जलद फॅशन कपड्यांचे बहुतेक ग्राहक युरोप आणि उत्तर अमेरिकेत आढळतात, याचा अर्थ असा, की उद्योगाच्या उच्च उत्सर्जन पातळीत वाहतूकदेखील मोठी भूमिका बजावते. या कारखान्यांमध्ये कच्चा माल वाहतूक करणे असो किंवा तयार उत्पादने पाठवणे असो; अनेक वैयक्तिक कपडे ग्राहकांपर्यंत पोहोचण्यापूर्वी अनेक वेळा जगभर प्रवास करतात.

२०२४ मध्ये एका अभ्यासात आढळून आले की केवळ जीन्सचे उत्पादन आणि वाहतूक जलद फॅशन वापराच्या कार्बन फूटप्रिंटमध्ये ९१ टक्के योगदान देते. फॅशन उद्योगाचे कार्बन उत्सर्जन २०३० पर्यंत २.८ अब्ज टनांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. ते ५५० दशलक्ष कारच्या कार्बन उत्सर्जनाइतके आहे. हे आकडे जगात कपडे कसे तयार होतात आणि वापरले जातात हे स्पष्ट करुन बदलण्याची तातडीची गरज दर्शवतात. अलीकडेच उच्च-गुणवत्तेची शाश्वत फॅशन, ज्याला 'स्लो फॅशन' असेही म्हणतात, व्यापकपणे स्वीकारण्याची चळवळ सुरू झाली आहे. याव्यतिरिक्त, कपड्यांच्या उत्पादनात साहित्याचा पुनर्वापर करण्यासाठी अधिक प्रयत्न केले जात आहेत. तथापि, कृत्रिम पदार्थांचे पुनर्वापर करण्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञान बहुतेकदा खूप महाग असते किंवा मुख्य प्रवाहात वापरण्यासाठी अवघड असते. या मोठ्या कापड आणि वस्त्र उत्पादकांमध्ये शाश्वत पुरवठा साखळीत योगदान देणारे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी अधिक गुंतवणूक आणि संशोधन आवश्यक आहे.

किरकोळ विक्रेते आणि सरकार या दोघांनीही पृथ्वीवर फॅशनमुळे होणारे प्रचंड प्रदूषण मर्यादित करण्यासाठी प्रयत्न करण्यास सुरुवात केली आहे. पॅटागोनियासारखे ब्रँड ग्राहकांना कपडे कमी वापरण्यास प्रोत्साहित करण्यासाठी मोफत कपडे दुरुस्ती सेवा देत आहेत. आदिदास कपड्यांचे परतावे आणि कचरा कमी करण्यासाठी अधिक वैयक्तिकृत कपड्यांचा प्रयोग करत आहे. जलद फॅशनच्या पर्यावरणीय परिणामांना संबोधित करण्यासाठी संसदेच्या काही सदस्यांनी केलेल्या हालचालींना ब्रिटनच्या मंत्र्यांनी मध्यंतरी नकार दिला, तर फ्रेंच अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी उद्योगात शाश्वतता वाढवण्यासाठी १५० ब्रँडसोबत करार केला. जगाला हे उत्सर्जन कमी करायचे असेल, तर ग्राहकांना आपले वर्तनदेखील बदलावे लागेल. काही देशांमध्ये खरेदी केलेले ४० टक्के कपडे कधीही घातले जात नाहीत, असे लक्षात येते. जलद फॅशनमुळे अशा संस्कृतीला चालना मिळाली आहे, जिथे अनेकदा नवीन ट्रेंड आणि शैलींना अनुकूल बनवण्यासाठी जवळ असलेले कपडे फेकून दिले जातात. अधिक सेकंडहँड कपडे खरेदी करणे आणि अधिक उच्च-गुणवत्तेचे, शाश्वत कपडे खरेदी करण्याकडे वाटचाल करणे हे दोन मार्ग आहेत. त्याद्वारे ग्राहक जलद फॅशनमुळे पर्यावरणावर पडणारा भार कमी करण्यास मदत करू शकतात. आज जगभरातील पर्यावरणवाद्यांसमोर गंभीर चिंता आहेत. काही कंपन्या आणि सरकारे या समस्येवर थेट लक्ष केंद्रित करत आहेत, तर काहींनी दोष टाळला आहे किंवा त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

फॅशन पुरवठा साखळीतील सर्व भागधारकांनी जास्त लोकसंख्येच्या कपड्यांच्या अतिवापरामुळे पृथ्वीला होणारे दीर्घकालीन नुकसान मर्यादित करण्यासाठी आणखी काही केले पाहिजे. 'फास्ट फॅशन'मुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. त्यात जल प्रदूषण, मोठ्या प्रमाणात पाणी आणि ऊर्जेचा वापर, मायक्रोप्लास्टिक कचरा, हरितगृह वायूंचे उत्सर्जन यांचा समावेश आहे. हे घटक हवामानबदलाला जबाबदार आहेत. यामध्ये जमीन आणि जलीय परिसंस्थेचा ऱ्हास समाविष्ट आहे. हा उद्योग जगातील सर्वात मोठ्या प्रदूषकांपैकी एक आहे. त्यामुळे सांडपाणी आणि कापडांचे मोठे ढीग निर्माण होतात. 'फास्ट फॅशन'मध्ये वापरल्या जाणाऱ्या कपड्यांपैकी ६० टक्क्यांपेक्षा जास्त कपडे नायलॉन आणि पॉलिस्टरने बनलेले असतात. ते जैवविघटनशील नाहीत आणि महासागरांमध्ये ३५ टक्के मायक्रोप्लास्टिक प्रदूषणाचे कारण बनतात. कापूस लागवडीत कीटकनाशके आणि रसायनांचा जास्त वापर होत असल्याने मातीची गुणवत्ता खालावत आहे. कपड्यांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात ऊर्जा, वीज आणि कोळसा वापरला जातो. त्यामुळे कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंमुळे जागतिक तापमानवाढ होते. रेयॉन-व्हिस्कोससारखे कपडे बनवण्यासाठी झाडांच्या लाकडाचा वापर केला जातो. त्यामुळे जंगलतोड वाढत आहे. रंगरंगोटी आणि रसायने नद्या आणि तलावांमध्ये जात असल्याने जलप्रदूषण वाढत आहे. त्यामुळे जलचरांचे मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर आता सर्वांनी जादा कपड्याचा हव्यास कमी करायला हवा.

चर्चा आजची

# महिलांनो, डोकं ठिकाणावर ठेवा!

राकेश लोहार

सध्याचा जमाना एआय म्हणजे आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा आहे. ही कृत्रिम बुद्धिमत्ता सध्या मानवी बुद्धीलाही थक्क करीत आहे. एआयचा वापर आता विविध कारणांसाठी करण्यात येत आहे. एआय चांगलं-वाईट हा मुद्दा पुढचाच. परंतु, सध्या एआयमुळे मानवी अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. पण, तो विचार करण्याइतपत मानवाने आपली बुद्धी गहाण ठेवलीय का, अशा पद्धतीने वागणे सुरू आहे.

सध्या प्रत्येकाच्या तोंडावर आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अर्थात 'एआय' हे नाव बसले आहे. आपल्या रोजच्या जीवाचा एआय हळूहळू भाग होत चालला आहे, असे म्हणावे, इतकी गंभीर परिस्थिती आहे. कारण, या 'एआय'च्या जमान्यात आपल्याला खोट्या गोष्टींमध्ये जास्त आनंद वाटू लागला आहे. म्हणजे, आताचा ट्रेंडच पाहा ना, समाजातील सर्वच स्तरातील महिला आपण चांगले दिसण्यासाठी फोटो एडिट करुन सोशल मीडियावर टाकत आहेत. असंख्य महिलांचे मोबाईल स्टेटस जर पाहिले, तर अंदाज येईल, एआयची किती भुरळ पडली आहे ते. परंतु, कालांतराने या एआयमुळे आपल्यातील खरेपणाही खोटा वाटू लागेल, याचा विचार समस्त महिला भगिनींनी केलेला नाही, हेही तितकेच खरंय. म्हणूनच आपण आहोत तसेच जगायला आणि बघायला शिकले पाहिजे. खोटेपणाचा मेकअप कधी ना कधी तरी उतरतोच, आणि मग खरा चेहरा जगासमोर येतो. परंतु, त्यावेळेस 'ती मी नव्हेच', हे सिद्ध करायलाही वेळ मिळणार नाही. त्यामुळे वेळीच सावध व्हा. नको ती आपत्ती स्वतःहून आपल्यावर ओढावून घेऊ नका.

सध्या सोशल मीडियावर 'एआय'च्या मदतीने गुगल जेमिनायच्या माध्यमातून 'डीप फेक' या कन्सेप्टमध्ये महिलांचे बनवलेले




बनावट फोटो आणि व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. महिलाही आपण कोण सुंदरी, जगावेळीच मीच, अशाच आविर्भावात सध्या वावरत आहेत. कारण, या ॲपच्या माध्यमातून रोज नवनवीन बनावट फोटो आणि व्हिडिओ तयार करण्यात येत आहेत, हे दिसून येत आहे. पण, आपले फोटो कोणा एका ॲपसाठी देऊन आपले स्वातंत्र्य आपण दुसऱ्याच्या स्वाधीन करीत आहोत, हे महिला भगिनींना कळून येत नसेल, याचेच नवल वाटते. अनेकदा एखाद्या पुरुषाने नुसते पाहिले, तर याबाबत त्या महिलेने तक्रार दिल्यास संबंधितावर गुन्हा दाखल होण्यापर्यंतच्या केसेस आपण रोजच्या वाचनात, तसेच समाजात वावरताना अनेकदा पाहिल्यात, ऐकल्यात. पण, असे फोटो करीत असताना, आपल्या स्वातंत्र्यावर गदा येऊ शकते, याचा विचार का होत नाही? अशा फोटोंच्या आडून काही चुकीची माहिती परसवली जाण्याचा धोका आपल्या लक्षात कसा येत नाही, याबाबतही आश्चर्य वाटते.

एआयचा आज जगात किती बोलबाला सुरू आहे, याची सगळ्यांनाच कल्पना आहे. याच एआयच्या जोरावर ज्या गोष्टींचा आपण कधी अगदी स्वप्नातही विचार केला नव्हता, त्या गोष्टी आता प्रत्यक्ष वास्तवात येऊ लागल्या आहेत. त्यातली अचूकताही अफाट म्हणावी अशी आणि मानवी कल्पनाशक्तीच्या पलीकडे आहे. हे जरी खरं असलं, तरी एआयमुळे निर्माण झालेल्या नवनव्या कहाण्याही समोर येऊ लागल्या आहेत. याच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर काही जण बेकायदेशीर कामांसाठी करीत आहेत. त्यामुळे तरुणी, महिलांचीच नव्हे, तर अख्ख्या जगाचीच झोप उडाली आहे. असे असतानाच जर आपल्या फोटोंचा वाईट कारणासाठी वापर करुन ती विवस्त्र छायाचित्रे इंटरनेटवर, सोशल मीडियावर फिरु लागली तर... विचार केला आहे का याचा? महत्त्वाचं म्हणजे, यातल्या बऱ्याचशा महिला, तरुणींना, त्यांच्या पालकांना याबाबत काही माहितीही नसेल. असणार तरी कसे? कारण, ही सर्व छायाचित्रे फेक, बोगस आहेत. एआयच्या साहाय्यानं ती तयार केलेली आहेत. त्यातल्या तरुणींचे चेहरे इतके हुबेहूब असतील, ही तरुणी ती नव्हेच, याबाबत कोणालाही काडीचीही शंका येणार नाही. या तरुणींना, त्यांच्या पालकांना ही गोष्ट कळेल, तेव्हा त्यांच्या पायाखालची वाळू नक्कीच सरकलेली असेल. चौकशीअंती सत्य समोर येईल तेव्हा येईल. तोपर्यंत झालेल्या बदनामीचे काय? जगासमोर आपला चेहरा कुठल्या 'फ्रेम'मध्ये असेल, याबाबत कधी तरी विचार करणार आहात, की सर्वच आपण सोडून दिली आहे. अशामुळे एक ना एक दिवस जगापासून तोंड लपवण्याची वेळ नाही आली म्हणजे झालं! महिलांच्या विरोधातील हा डिजिटल हिंसाचार येत्या काळात जगापुढची अतिशय मोठी समस्या असेल! त्यामुळे महिला भगिनींना एवढेच सांगणे असेल, कृत्रिम बुद्धीसमोर स्वतःची बुद्धी गहाण टाकल्यासारखे वागू नये. वेळीच सावध व्हा!

लोकसंसद

# धर्माजीशेठ म्हात्रे यांना आदरांजली

पेण तालुक्यातील डोलवी गावातील सुसंस्कृत व सर्वांना आदरपूर्वक वागणूक देणारे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते धर्माजीशेठ म्हात्रे यांचे नजीकच्या काळात निधन झाले. धर्माजीशेठ हे गोरगरिबांची कामे करणारे तसेच निःपक्षपाती काम करणारे एक निष्ठावंत नेते होते. पेण तालुक्यातील माजी खासदार ए.टी.पाटील यांनी समाजदेवोभवः ही घोषणा करुन लोकसभेची निवडणूक लढविली. त्यावेळी जिल्ह्यातील सर्व आगरी समाजाला हाक देऊन पेण तालुक्यातील जवळपास ८० टक्के समाजाला आपल्याकडे खेचले. त्यांचे खरे नेतृत्व डोलवीकरांनी केले. त्याच्यामध्ये धर्माजी म्हात्रे व बाळाजी म्हात्रे प्रमुख होते. ए.टी.पाटील यांचे खंदे समर्थक म्हणून धर्माजी म्हात्रे यांचे नाव होते. धर्माजी व बाळाजी या दोघांनी पेण तालुक्यातील सर्व आगरी समाज एकत्र करण्याचे काम केले. याच पार्श्वभूमीवर लोकसभेनंतर १९७२ च्या विधानसभेत सुद्धा त्यांनी निवडणूक लढविली. त्यावेळी शेकापने ए.टी.पाटील यांना पाठिंबा दिला होता.



निवडणूकीपूर्वी धर्माजी व बाळाजी वडिल स्व. प्रभाकर पाटील यांना भेटायला घरी येत. वडिलांसोबत चर्चा करुन त्यांनी शेकापचा पाठिंबा मिळविला. त्यामध्ये धर्माजी म्हात्रे यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. माझे व त्यांचे व्यक्तिगत संबंध शेवटपर्यंत चांगले राहिले. निधनापूर्वी शेवटच्या काळात त्यांच्या सर्व मुलांनी त्यांची अतिशय चांगली सेवा केली, हे पाहून खूप आनंद झाला. त्यांचे एक वकिल पुत्र आहेत, त्यांना सेवा करताना मी प्रत्यक्षात पाहिले. पेण शहरात जे समाजभवन उभारण्यात आले आहे, त्यामध्ये धर्माजी म्हात्रे यांचा सिंहाचा वाटा आहे. २००० सालापर्यंत शेकाप व काँग्रेस यांच्यात संघर्षमय वातावरण होते. या कालावधीत धर्माजी म्हात्रे यांनी नेहमी सामंजस्याने भूमिका घेऊन संघर्ष टाळला. समाजासाठी त्यांनी जे उल्लेखनीय कार्य केले, त्या कामांच्या पुण्याईमुळेच त्यांना चांगले आयुष्य मिळाले. पेण तालुक्यातील ए.टी.पाटील व काँग्रेसबरोबर असलेल्या सर्व ज्येष्ठ नेत्यांपैकी धर्माजीशेठ हे शेवटचे सहकारी असतील, असे वाटते. निवडणूक लढविल्यानंतर, विजय मिळविल्यानंतर तसेच चांगली कामगिरी केल्यास किंवा पुरस्कार प्राप्त झाल्यास ते आवर्जून आशीर्वाद द्यायचे, हे मी कधीही विसरु शकणार नाही. पेण तालुक्यातील खारेपाट विभागात धर्माजी म्हात्रे यांचा दबदबा होता. त्यामुळे कुणीही त्यांचा शब्द खाली पडू देत नसे. त्यांनी कधीही पक्ष बदलला नाही. शेवटपर्यंत काँग्रेस पक्षासोबत एकनिष्ठ राहिले, याची आठवण पेणकर निश्चित ठेवतील, असे वाटते. त्यांच्यासोबतच्या अनेक आठवणी आहेत. त्यांच्यासोबत एक वेगळे नाते होते. म्हणूनच त्यांच्या आठवणी शब्दांत मांडण्याचा प्रयत्न केला. समाजासाठी झटणाऱ्या अशा निष्ठावंत नेत्याचे स्मरण कायम राहिल.

जयंत पाटील
सरचिटणीस, शेकाप.

दिनविशेष

# पत्रकार, समाजसुधारक, वक्ते प्रबोधनकार ठाकरे

केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे हे मराठी पत्रकार, समाजसुधारक, वक्ते व इतिहासकार होते. महाराष्ट्र राज्याला लाभलेलं हे मोठं रत्न होतं. शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांचे ते वडील तर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे ते आजोबा होते. प्रबोधनकार ठाकरे यांचा जन्म १७ सप्टेंबर १८८५ रोजी पनवेल येथे झाला.


प्रबोधनकार यांनी आपले प्राथमिक शिक्षण पनवेल येथून पूर्ण केले. पुढे देवास येथे त्यांनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेतले. वडिलांची नोकरी गेली आणि पनवेलमध्ये पुढील शिक्षणाची व्यवस्था नसल्याने त्यांचे शिक्षण थांबले. त्यामुळे त्यांना कधी बारामतीत तर कधी मध्य प्रदेशातील देवासमध्ये धाव घ्यावी लागली. दीड रुपये फी कमी पडल्याने ते मॅट्रिकची परीक्षा देऊ शकले नाहीत. आणि त्यांचे वकील होण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. पण ते थांबणाऱ्यातले नव्हते. त्यांनी साईन बोर्ड पेंटिंग, रबर स्टॅम्प बनवणे, बुक बाइंडिंग, वॉल पेंटिंग, फोटोग्राफी, मशीन मेकॅनिक इत्यादी उद्योग केले. आपल्या हाती कौशल्य असेल मग बेरोजगारी कशाला? हे त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. प्रबोधनकार ठाकरे यांनी कधी नाटक कंपनीत तर कधी सिनेमा कंपनीत काम केले. कधी गावोगावी जाऊन ग्रामोफोन विकले. कधी विमा कंपनीची जाहिरात केली, कधी शाळेत शिक्षकाचे काम तर कधी इंग्रजी भाषिक वर्ग चालविण्याचे काम त्यांनी केले. एका खासगी कंपनीत सेल्समन आणि जनसंपर्क अधिकारी म्हणूनही त्यांनी काम पाहिले. अनेकवेळा त्यांनी पत्रकारांना वक्त्यांच्या भाषणाच्या प्रती दिल्या. निवडणूक उमेदवारांना जाहीरनामा लिहून दिले. त्यांनी पीडब्ल्यूडीमध्ये शॉर्टहँड टायपिस्ट ते अभिलेख विभागाचे मुख्य लिपिक अशी दहा वर्षे सरकारी नोकरीही केली. हा त्यांच्या आयुष्याचा स्थिर काळ होता. याशिवाय जीवाची बाजी लावून ते लढत राहिले. पत्रकारिता, लेखन आणि प्रिंटींग हे त्यांच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत होते. ते एका नाटक कंपनीत काम करत होते. दरम्यान जानेवारी १९१० रोजी अलिबागजवळील वरसोली गावात ते विवाहबद्ध झाले. दादरला स्थायिक झाल्यावर वांद्रे येथील मातोश्री बंगल्यावर जाईपर्यंत ते तिथेच राहिले. त्याआधी भिवंडीपासून अमरावतीपर्यंत त्यांचा प्रवास सुरुच होता. त्यांना चार मुलगे आणि सहा मुली अशी एकूण दहा मुले होती. अस्पृश्यता निवारण, हुंडाविरोध यांसारख्या सामाजिक सुधारणांसाठी त्यांनी आपली वाणी व लेखणी उपयोगात आणली. बहुजनसमाजोद्धाराच्या आंदोलनांप्रमाणेच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही त्यांनी भाग घेतला. त्यासाठी तुरुंगवास भोगला. अभिनिवेशयुक्त पण अत्यंत सडेतोड, ठाशीव आणि प्रखर भाषा हे त्यांच्या वाणीलेखणीचे वैशिष्ट्य होते. अशा या महान इतिहासकाराचे २० नोव्हेंबर १९७३ रोजी निधन झाले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१७ सप्टेंबर**

१)श्री.आरूण रघुनाथ पाथरे
मु.कुरूळ, अलिबाग,
१७-०९-१९४८

## सुवर्णकण



समाजसेवा, साधू सेवा, ईश्वर सेवा नामस्मरण, निष्ठावंत भाव या पंचसूत्रीचा अवलंब करणाऱ्या साधकास ईश्वरप्राप्ती नजीक असते.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

## सौरभ कुलकर्णी यांना एमटेक पदवी

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

कळंबस्ते येथील प्रतिष्ठित ठेकेदार रवींद्र कुलकर्णी यांचे सुपुत्र सौरभ कुलकर्णी यांनी पुण्यातील सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठातून नुकतीच एमटेक पदवी संपादन केली आहे. सौरभ कुलकर्णी याला दि.२९ ऑगस्ट रोजी झालेल्या पदवीदान समारंभात एमटेक ही पदवी प्रदान करण्यात आली. शिक्षणाबरोबरच कुटुंबाचा व्यवसाय सांभाळण्याची जबाबदारीही पार पाडत सौरभने केलेल्या मेहनतीला अखेर यश मिळाले. आमदार शेखर निकम यांनी सौरभच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत, शिक्षण आणि व्यवसाय या दोन्ही क्षेत्रात समतोल साधणाऱ्या तरुणांचे प्रयत्न समाजासाठी प्रेरणादायी ठरतात, असे गौरवोद्गार काढले.

# ओबीसींकडून जिल्ह्यात निषेध

## ● सरकारच्या भूमिकेला कुणबी समाजाचा तीव्र विरोध

**। रोहा । प्रतिनिधी ।**

कुणबी ओबीसींच्या आरक्षणात मराठा समाजाला सरकारने आरक्षण दिले. हे आरक्षण थांबविण्याबाबत सोमवारी (दि.१५) संपूर्ण कुणबी समाजाच्या वतीने कोकणातील सात जिल्ह्यात तसेच रायगड जिल्ह्यातील सर्व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. ओबीसी संघर्ष समन्वय समिती व जनमोर्चा यांच्या संयुक्त विद्यमानाने आणि रायगड जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष सुरेश मगर व कुणबी समाजोन्नती संघ मुंबई सलग्न शाखा रायगड जिल्हा अध्यक्ष शिवराम महाबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवेदन देण्यात आले. यावेळी कुणबी समाज बांधवांसह तालुक्यातील ओबीसी समाजाचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

२ सप्टेंबर, २०२५ रोजी हैद्राबाद गॅजेटीअरमधील नोंदी विचारात घेवून मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, कुणबी मराठा किंवा मराठा कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीबाबत जो शासन निर्णय केला आहे. तो ओबीसींना आरक्षणापासून बेदखल करण्याचाच प्रकार आहे. हा निर्णय मूळ कुणबी जातीवर आणि ओबीसींवर अन्याय करणारा आहे. त्याबद्दल राज्यसरकारचा यावेळी तीव्र निषेध करत हे निवेदन दिले.

दि. ५ मे, २०२१ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने मराठा समाजाला आरक्षण नाकारले आहे. त्यामुळे मराठा समाज ओबीसींचे तुटपुंजे २७ टक्के आरक्षणही हिसकावून घेत आहे. राज्य सरकार मराठा समाजाच्या दबावासमोर झुकत आहे. शासनाच्या या पक्षपाती वागणुकीमुळे महाराष्ट्रातील कुणबी-ओबीसींमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. मराठा आणि कुणबी या दोन स्वतंत्र जाती आहेत. त्यामुळे एका व्यक्तीच्या दोन जाती असणे हे घटनाबाह्य व नियमबाह्य आहे. तरीही सरकार मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किवा कुणबी, मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी शासन निर्णय घेऊन मूळच्या कुणबी जातींवर घोर अन्याय करीत आहेत. त्यामुळे मराठ्यांना देण्यात येत असलेले सरकट कुणबी दाखले तथा ओबीसी आरक्षण हे सरकारने रद्द करावे, अशा मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.



### रायगड जिल्ह्यात सर्वत्र तहसीलदारांना निवेदन

सोमवारी १५ सप्टेंबर रोजी कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संघाच्या आदेशाने ओबीसींना सोबत घेऊन कोकणातील मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, आणि सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यात संघ अध्यक्ष अनिल नवगणे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याचे मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांना तहसीदार यांच्यामार्फत हे निवेदन देण्यात आले. रायगड जिल्ह्यात ओबीसी सेलचे अध्यक्ष सुरेश मगर तसेच कुणबी समाजाचे रायगड जिल्हा अध्यक्ष शिवराम महाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देत रोहा तालुक्यात दोन्ही अध्यक्षांच्या उपस्थित रोहा तहसीलदार यांना हे निवेदन देण्यात आले.



## गणेशोत्सवानिमित्त आरोग्य शिबीर

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

शासनाच्या आदेशानुसार मुख्यमंत्री सहायता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या समन्वयाने राबविण्यात येणाऱ्या आरोग्य अभियान यांच्या अंतर्गत भ.क.ल. वालावलकर रुग्णालय डेरवण-चिपळूण या रुग्णालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या मोफत आरोग्य व रक्तदान शिबिरास गणेश मंडळाकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

या रुग्णालयाकडून ओम साई मित्र मंडळ केळसकर नाका, दापोली, श्री सार्वजनिक गणेश मंडळ, सावर्डे, सार्वजनिक गणेश मंडळ खेर्डी बाजारपेठ, सार्वजनिक गणेश मंडळ राहुल गार्डन काविळतळी, खेड शहर शिवसेना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या मंडळाच्या मदतीने सदर शिबिरामध्ये ४५० हून अधिक रुग्णांनी सहभाग घेतला व आपली तपासणी करून घेतली.

## शासन निर्णयाविरुद्ध कुणबी समाज एकवटला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्य सरकारने हैदराबाद गॅजेटियरच्या आधारे मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याचा घेतलेला निर्णय यामुळे संपूर्ण कोकणात संतापाचा ज्वालामुखी पसरला आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर मुंबई आणि उपनगरातील सर्व तहसील कार्यालयात सोमवारी (दि.१५) कुणबी समाजोन्नती संघ मुंबई व ओबीसी संघर्ष समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली संतप्त ओबीसी कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयात तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

ओबीसी आरक्षण बचाव आंदोलन संदर्भात महाड व पोलादपूर तालुक्यातील ओबीसी समाजाच्या वतीने महाड पोलादपूर तहसीलदार कार्यालवर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी आक्रोश निदर्शनाने, घोषणाबाजीने सरकारच्या निर्णयाविरोधात कुणबी समाज एकवटल्याचे दृश्य पहायला मिळाले.

महाड निवासी तहसीलदार महेश शितोळे व पोलादपूरचे निवासी तहसीलदार कपिल घोरपडे यांच्याकडे २४ मागण्यांचे निवेदन कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा महाड, पोलादपूर व ओबीसी संघर्ष समिती व कुणबी समाज उन्नती मंडळ यांच्या वतीने देण्यात आले.

### निवेदनातील प्रमुख मागण्या

हैदराबाद गॅजेटियर आधाराने मराठा समाजाला ओबीसीचे प्रमाण देऊ नये, १ जून २००४ रोजी ओबीसींच्या यादीत समाविष्ट करण्यात आलेल्या मराठा कुणबी व कुणबी मराठा पोटजातीचा शासननिर्णय तत्काळ रद्द करावा, जातिनिहाय जनगणना करण्यात यावी, शामराव पेजे महामंडळास पंधराशे कोटी रुपये निधीची तरतूद करावी, पेजे समिती व म्हसकर समितीच्या प्रलंबित मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, बेदखल कुळ, कुणबी सांस्कृतिक केंद्र, मोफत शिक्षण व नॉनक्रिमिलेअर अट रद्द करावी, महाज्योती शिष्यवृत्ती लागू करावी, अशा २४ मागण्या करण्यात आल्या आहेत.

# तळा तालुक्यात ओबीसी आक्रमक

**। तळा । प्रतिनिधी ।**

ओबीसी समाजाने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन तळा तालुक्यातील ओबीसी समाजातर्फे तळा तहसीलदारांना देण्यात आले.



हैद्राबाद गॅजेटीअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, कुणबी मराठा किंवा मराठा कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीबाबत जो शासन निर्णय केला आहे. तो निर्णय मूळ कुणबी जातीवर आणि ओबीसींवर अन्याय करणारा आहे. तसेच मराठा समाज ओबीसींचे तुटपुंजे २७ टक्के आरक्षणही हिसकावून घेत आहे. सरकार मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी, मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी शासन निर्णय घेऊन मूळच्या कुणबी जातींवर घोर अन्याय करीत आहे. त्यामुळे राज्यसरकारने हा जीआर मागे घ्यावा या मागणीसह आपल्या विविध मागण्यांचे निवेदन ओबीसी समाजातर्फे जनमोर्चा काढून तळा तहसीलदारांना देण्यात आले. याप्रसंगी तालुक्यातील ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुणगौरव सोहळा

**माणगाव** : आगरी समाज माणगाव विभाग शैक्षणिक सामाजिक विकास मंडळ माणगाव यांच्यातर्फे आगरी समाजातील शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक क्षेत्रामध्ये यश संपादन केलेल्या गुणवंतांचा सत्कार सोहळा बुधवारी (दि.१४) माणगाव येथे पार पडला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या यशस्वी मान्यवर, दहावी, बारावीतील उत्तीर्ण विध्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, पदवी, पदविका प्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## तळा तालुक्यात सेवा पंधरवडा सुरु

**। तळा । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातंर्गत सेवा पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. तळा तालुक्यातील सर्व गावांमध्ये दि. १७ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबर या कालावधीमध्ये सेवा पंधरवाडा साजरा करण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत तीन टप्प्यात कामे केली जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात पाणंद व शिवरस्त्यांचे सर्वे क्षण करुन क्रमांक देणे, नोंदी करणे आणि मोजणी करणे यावर भर दिला जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात सर्वांसाठी घरे या योजनेसाठी उपलब्ध सरकारी जमीनीवरील २०११ पूर्वीचे निवासी घरे नियमानुकूल करणे आणि पात्र लाभार्थ्यांना पट्टे प्रदान करणे याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. तिसऱ्या टप्प्यात मा. जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक अर्थसहाय्य लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याचे काम पूर्ण करणे, आयुष्यमान भारत कार्ड मोहीम घेणे, स्मशानभूमीकडील रस्ता उपलब्ध असल्याबाबत खातरजमा करणे यासारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



## जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

शिक्षणासोबतच समाजसेवेची परंपरा जपणाऱ्या पेढांबे येथील मंदार एज्युकेशन सोसायटीने पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले आहे. संस्थेच्या वतीने कोळकेवाडी येथील श्रमिक सहयोग संचलित प्रयोगभूमी या संस्थेला जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे प्रयोगभूमीतील विद्यार्थी व रहिवासी वर्ग आनंदित झाला असून संस्थेच्या कार्याला सर्व स्तरातून दाद मिळत आहे. यावेळी उपस्थितांनी प्रयोगभूमीतील विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या गरजांची माहिती घेतली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान हे या उपक्रमाचे यश असल्याचे मत सर्वांनी व्यक्त केले. तसेच, मंदार एज्युकेशन सोसायटी नेहमीच सामाजिक जाणीव जोपासत विविध उपक्रम राबवत असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# मराठा आरक्षणाविरोधात तहसीलदारांना निवेदन

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेतला आहे. या निर्णयाला कुणबी समाजासह इतर ओबीसी (इतर मागासवगीय) समाजाकडून तीव्र विरोध होत आहे. मराठा आरक्षणाविरोधात कोकणातील कुणबी समाजाकडून आंदोलनाची रणनीती आखली जात आहे. यातील पहिला भाग म्हणून शासनाला (तहसीलदार यांचे मार्फत) सोमवारी (दि.१५) प्रचंड संख्येने निवेदन देण्यात आले.



रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तहसीलदार कार्यालयावर निवेदन देण्यात आली. या आंदोलनानंतर कुणबी समाज आक्रमकपणे आंदोलन करणार असल्याचे समाजाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. कुणबी समाजाची मातृसंस्था असलेल्या मुंबईतील कुणबी समाजोन्नती संघ येथे बुधवारी कोकणातील सातही जिल्ह्यातील सर्व मराठा शाखा पदाधिकाऱ्यांची सभा घेण्यात आली. या सभेत आरक्षणाविरोधातील आंदोलनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आंदोलनाची सुरुवात म्हणून शासनाला कुणबी समाजाकडून त्यांचे लेखी म्हणणे मांडून ते निवेदन निवासी नायब तहसीलदार शिरसाट यांच्याकडे देण्यात आले.

### जीआरमुळे ओबीसींच्या हक्कांवर येणार गदा?

कुणबी समाज हा आधीपासूनच ओबीसी प्रवर्गात आहे. त्यांना या आरक्षणाचा समाजातील व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र मिळाले आणि ते ओबीसीमध्ये समाविष्ट झाले, तर सध्याच्या ओबीसी समाजाच्या आरक्षणावर परिणाम होईल, अशी भीती या समाजातील लोकांना वाटत आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जो सरकारी निर्णय काढला आहे, तो बेकायदेशीर आणि संवैधानिक नियमांच्या विरोधात आहे, असा आरोप ओबीसी समाजातील नेते महादेव पाटिल यांनी केला.

## महामार्गावरील पथदिव्यातील केबलची चोरी | पालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान

# भुरट्या चोरांमुळे विद्युत विभाग हैराण

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

**सायन-पनवेल महामार्गावरील पथदिव्यांमधे बसवलेल्या वीजवाहिन्या चोरणारी टोळी महामार्गावर कार्यरत आहे. वीजवाहिन्यांच्या चोऱ्यांमुळे वीजपुरवठा खंडीत होऊन महामार्गावर पसरणारा अंधार दूर करण्यासाठी विद्युत विभागाला मोठी कसरत करावी लागत असून मोठा आर्थिक भुर्दंडदेखील सहन करावा लागत आहे.**



सायन-पनवेल महार्गावर बेलपाडा गाव ते खांदा वसाहत या ८ किलोमीटर अंतरावरील ४३८ खांबांवर बसवण्यात आलेल्या १ हजार २३८ दिव्यांची देखभाल आणि दुरुस्ती करण्याची जबाबदारी पनवेल पालिकेच्या विद्युत विभागाकडून करण्यात येते. या कामाकरता पालिकेच्या माध्यमातून खासगी कंत्राटदार कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. असे असताना अनेकदा मार्गावरील पथदिवे बंद असल्याचे निदर्शनास येत असल्याने बंद असलेल्या या दिव्यांबाबत पालिकेच्या विद्युत विभागाकडे माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता पथदिव्यांमध्ये वीज पुरवठा करण्यासाठी टाकण्यात आलेल्या वीजवाहिन्यांची चोरी केल्याच्या घटना घडत असल्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२५ पासून आतापर्यंत तीन वेळा विद्युत विभागाच्या कर्मचाऱ्यांनी वीजवाहिन्या चोरी करणाऱ्या चोरट्यांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. तसेच बेलापूर, खारघर तसेच कामोठे पोलीस ठाण्यात तशा स्वरूपाची तक्रार देखील दाखल केली असल्याची माहिती दिली आहे. त्याचसोबत चोरी केलेल्या वीजवाहिन्यांची खरेदी करणाऱ्या एका भंगार व्यावसायिकाच्या विरोधातदेखील तक्रार करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

चोरट्यांनी आतापर्यंत २ हजार ८०० मीटर लांबीच्या वीज वाहन्यांची चोरी केली असून, बाजार भावाप्रमाणे २ लाख ६० हजार अतिरिक्त रकमेचा भुर्दंड पालिकेच्या विद्युत विभागाला सहन करावा लागला आहे.

### दिव्यांच्या देखभालीची जवाबदारी पालिकेवर

सायन-पनवेल महामार्गावरील बेलपाडा ते खांदा वसाहती दरम्यान असलेल्या ८ किलोमीटर अंतराच्या मार्गावर ४३८ खांबावर १ दोनशे ३८ दिवे आहेत. तसेच ६ ठिकाणी हायमास्ट दिवे असून २०२२ सालापासून या दिव्यांची देखभाल आणि दुरुस्ती करण्याची जबाबदारी पालिकेच्या खांद्यावर आहे.

## गणपत भोकटे यांचे निधन

**धाटाव** : रोहा तालुक्यातील धाटाव गावातून प्रथमतः पोलीस खात्यात रुजू झालेले जेष्ठ नागरिक गणपत बाबू भोकटे यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या अंत्ययात्रेमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांसह मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, पुतणे, सूना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार दि.२२ सप्टेंबर रोजी तर उत्तरकार्य विधी बुधवार दि.२४ सप्टेंबर रोजी धाटाव येथील निवासस्थानी होणार आहेत.

## निवडक



### कर्जत ओबीसी समाज संघटनांचा निवेदनाद्वारे विरोध

**नेरळ** : कुणबी जातीचा ओबीसीमध्ये समावेश असल्याने कर्जत तालुक्यात खाडाखोड करून कुणबी नोंदी घातल्या जात आहेत. त्या नोंदींना कर्जत तालुका ओबीसी समाज संघटना महासंघ यांनी निवेदनाद्वारे विरोध केला. ओबीसी समाज संघटना महासंघ यांच्या माध्यमातून कर्जत तहसीलदार आणि प्रांत अधिकारी यांना निवेदन देऊन आक्षेप नोंदवला आहे. ओबीसीमध्ये मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी काढण्यात आलेला जीआर रद्द करावा, अशा मागण्या यात केल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने हैद्राबाद गॅझेट आणि सातारा गॅझेट यांचा आधार घेऊन मराठा समाजाला आरक्षण दिले आहे. कुणबी नोंदी नुसार देण्यात येत असलेल्या आरक्षणाला आमचा विरोध नाही, मात्र सरसकट मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समावेश करणे आणि चुकीच्या पद्धतीने कुणबी नोंदी घालण्याचे प्रकार यांस ओबीसी समाजाचा पूर्ण विरोध आहे. हा विरोध नोंदवण्यासाठी कर्जत तालुका ओबीसी समाज संघटना महासंघाच्या वतीने कर्जत येथे प्रांत अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

### लोकसेवा सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा

**रेवदंडा** : कै.ॲड दत्ता खानविलकर यांच्या प्रेरणेने व पै. अब्बास तांडेल यांच्या प्रयत्नाने ७६ वर्षापूर्वी गोरगरिबाच्या लाभाकरीता विविध व्यवसायासाठी कार्यरत असलेली लोकसेवा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेडची वार्षिक सर्वसाधरण सभा रविवारी (दि.१४) दुपारी ३ वाजता घेण्यात आली. या सभेत मागील सभेचे इतिवृत्तातवाचन, अहवाल हिशोब पत्रके वाचून मंजूर करणे, ऑडीट मेमोचे वाचन करणे, कर्ज वाटपाचे धोरण ठरवून कर्ज वसूलीबाबत विचार व्यवस्था करणे, लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षकांची नियुक्ती करणे, बाहेरील कर्ज काढण्याची मर्यादा ठरविणे, प्राथमिक कृषी पतपुरवठा सहाकारी संस्थाचे सक्षमीकरण अर्थसहाय्य, मागणी प्रस्ताव, पाठविण्याबाबत चर्चा करणे, संचालक मंडळ ठेवील अशा कामाचा विचार करणे व आयत्या वेळीचे विषय आदी कामकाज पार पडले.

### तुपारे यांना सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार



**नागोठणे** : कोकण एज्युकेशन सोसायटीच्या येथील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख व प्राध्यापक डॉ. श्रीकृष्ण दिगंबर तुपारे यांना ग्रामीण महाविद्यालय विभागात दिला जाणारा व अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. केंद्रिय अल्पसंख्याक व संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांच्या हस्ते व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक डॉ. रविंद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ.अजय भामरे, कुलसचिव डॉ. विलास कानाडे यांच्या उपस्थितीत हा सोहळा मुंबई विद्यापीठ सभागृहात सोमवारी (दि.१५) पार पडला. प्रा. तुपारे यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.



### कुणबी, ओबीसींचा आक्रोश

**माणगाव** : हैद्राबाद गॅजेटीअरमधील नोंदी विचारात घेऊन दि.२ सप्टेंबर रोजी मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, कुणबी मराठा किंवा मराठा कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीबाबत शासन निर्णय केला आहे. हा निर्णय ओबीसींना आरक्षणापासून बेदखल करण्याचाच प्रकार आहे. हा निर्णय मूळ कुणबी जातीवर आणि ओबीसींवर अन्याय करणारा आहे. यासाठी दि.१५ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वा. माणगाव तहसील कार्यालयासमोर सरकारचा तीव्र निषेध करीत माणगाव तहसीलमध्ये तहसीलदारांना कुणबी ओबीसी जनमोर्चातील आंदोलनकर्ते आक्रमक होत निवेदन दिले. यावेळी अनेक कार्यकर्ते पदाधिकारी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सरकारने मागण्यांचा विचार न केल्यास दि. ७ ऑक्टोबरला मुंबई आझाद मैदनावर लाखोच्या संख्येने मोर्चा काढण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. तसेच, राज्य सरकार मराठा समाजाच्या दबावासमोर झुकत आहे. शासनाच्या या पक्षपाती वागणुकीमुळे महाराष्ट्रातील तमाम कुणबी-ओबीसींमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे.



### विद्यार्थ्यांनी फुलविला भाजीचा मळा

**म्हसळा** : प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत शाळांमध्ये परसबाग निर्माण करून परसबागेतील उपलब्ध भाजीपाला शालेय पोषण आहारामध्ये समाविष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने म्हसळा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक मांदाटणे शाळेच्या विद्यार्थ्यांनी परसबागेत भेंडी, शिराळे, वांगी, दुधी भोपळा, कारले, तोंडली, शेवगा, चवळीच्या शेंगा, मिरची, काकडी आदी भाजीपाला शाळा परसबागेत फुलविला जातो. मुलांनी भाजीपाल्यासोबत मका, काकडी, अननस, पपई, केळी, चिकू, पेरू ही फळ विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात देण्यात येत असल्याचे शिक्षक नरेश सावंत यांनी माहिती देताना सांगितले. शाळेतच परसबाग निर्मिती केल्याने विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीकता निर्माण होऊन शेती विषयक ज्ञान प्राप्त होत आहे यातूनच पोषण आहार मिळावा आणि कुपोषण दूर व्हावे असे चांगले हेतू साध्य होत आहेत.

## निवडक



### चिरनेर गावात विकासकामांना गती

**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीने चिरनेर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी गाव विकासाला चालना देण्यासाठी सरपंच भास्कर मोकल यांच्या नेतृत्वाखाली विविध विकासाची कामे हाती घेतली आहेत. यात ग्रामपंचायतीने गावातील अंतर्गत मुख्य रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाला प्रथम प्राधान्य दिले आहे. याशिवाय ग्रामपंचायत हद्दीतील दाखोडी वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रेटीकरण, बेलदार वसाहतीमधील रस्ताचे काँक्रिटीकरण, तिरंगा पतपेढी ते पूजा हॉटेल पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरणही करण्यात आले आहे. त्याचबरोबर बेलदारवाडी, एसटी स्टँड व खारपाटील आळीतील सांडपाणी वाहणाऱ्या नादुरुस्त गटारांचे नव्याने बांधकाम करण्यात आले आहे. दरम्यान प्राथमिक केंद्र शाळा, अक्कादेवी शाळा व केळाचा माळ शाळा व सर्व अंगणवाड्यांना सौरऊर्जा तसेच चिरनेर ग्रामपंचायत कार्यालय, पशुवैद्यकीय दवाखाना, प्राथमिक शाळा व अंगणवाड्यांना रेन वॉटर हार्वेस्वीग बसविण्यात आले. विशेषता: अत्यावश्यक रुग्णांसाठी रुग्णवाहिकेची सोय करण्यात आली आहे.

### कर्करोग तपासणीचे आयोजन

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील महिलांची आरोग्य तपासणी तसेच प्रामुख्याने कर्करोग तपासणी शिबीर शनिवार (दि.२०) सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे. कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे माध्यमातून हे शिबीर आयोजित करण्यात आले असून रोटरी क्लब देवनार मुंबई यांच्या माध्यमातून कर्करोग तपासणी शिबीर होणार आहे. तर महिला रुग्णांची आरोग्य तपासणी रायगड हॉस्पिटल अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर यांच्या माध्यमातून नेरळ येथील आगरी समाज हॉल येथे कर्करोग तपासणी होणार आहे. आरोग्य शिबिरासाठी कर्जत आरोग्य विभागाचे मुख्य सहकार्य असणार आहे. या शिबिरामध्ये महिलांची कर्करोग तपासणी आणि मार्गदर्शन करण्यासाठी मुंबई देवनार रोटरी क्लब यांचा पुढाकार आहे. या शिबिरात महिलांची जनरल आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी तसेच अन्य सर्व तपासण्या करण्यात येणार आहेत. तालुक्यातील महिला वर्गाने या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन या शिबिराचे आयोजक कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे यांनी केले आहे.

### पी.एम. श्री शाळेचे कौतुक

**नेरळ :** कर्जत तालुका दौऱ्यावर असलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी कळंब येथील पी एम श्री केंद्र शाळेला भेट दिली. दरम्यान, विद्यार्थ्यांशी संवाद साधातल्या नंतर विद्यार्थ्यांची प्रगती बघुन आनंद व्यक्त केला. जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी



डॉ. नेहा भोसले यांनी कळंब येथील पी एम श्री शाळला भेट दिली. त्यावेळी कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील, गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे तसेच अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या भेटी दरम्यान शाळेतील उत्कृष्ट पटसंख्या, अत्यंत आनंददायी, सुरक्षित शैक्षणिक वातावरण, शालेय स्वच्छता, विद्यार्थी गुणवत्ता याबाबतीत मुख्याध्यापक व शिक्षकांचे कौतुक केले. शाळेत नव्याने स्थापित झालेल्या संगणक आयडियल सेंटरचा रोजच्या दैनंदिन अध्यापनात अधिकाधिक उपयोग करावा तसेच विद्यार्थी गुणवत्ता अधिक जोमाने वाढवावी अशा सुचना केल्या तसेच जिल्हा परिषद शाळांवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले.

### उरणमध्ये रानडुक्करांची शिकार

**उरण :** उरण तालुक्यातील डोंगराळ तसेच खाडी किनाऱ्यावरील खारफुटीच्या जंगलात रानडुक्करांची शिकार केली जात आहे. त्यामुळे रानडुक्करांची जात संपुष्टात येणार आहे. तालुक्याला वनसंपदेचे वरदान लाभले आहे. तालुक्यातील ससा, भेकर, बिबट्या, मोर, रानडुक्करासह इतर वन प्राण्यांची संख्या कमी होत चालली आहे. त्यात सध्या डोंगराळ तसेच खाडी किनाऱ्यावरील खारफुटीच्या जंगलातील रानडुक्करांनी मोर्चा भात शेतीत खेकडे खाण्याकडे वळविला आहे. त्या रानडुक्करांची शिकार करण्यासाठी काही शिकारी धडपडत आहेत. त्यामुळे रानडुक्करांची जात संपुष्टात येणार आहे. तरी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी या घटनेकडे दुर्लक्ष न करता वन प्राण्यांच्या संरक्षणासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी प्राणी मित्रांकडून करण्यात येत आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, मोरी सहाय्यक (Helper) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल : ७५५९१८४६१२
- नागावमधील होम स्टे/वाडी सांभाळण्यासाठी पर्मनंट जोडपे हवे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- ९८२०६०९४५०.
- ''जन्नावर हॉस्पीटल'' अलिबाग-मध्ये कामसाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509
- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत. १) नर्स ANM/ GNM २) नर्स Private Nursing Course. ३) मुले/मुली १२ वी पास. ४) X-Ray साठी मुले, ५) मावशी/आयाबाई, ६) रिसेप्शनिस्ट. आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग, ७७४५०५००२५, ९११९५६५०२२, ९३२१३०३९३८
- Job Opening – Restaurant Manager Burgers & Booch, Ranjanpada, Alibaug Requirements : English & Hindi (spoken/written), computer skills, college degree (freshers welcome). Salary : ₹15,000/month → ₹18,000 after 3 months + tips/ service charge (₹3,000–₹8,000). Accomodation & meals provided, weekly off (Tuesday). Timing: 12 AM – 11 PM. Whatsapp 7506954611 to apply.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# पाणंद रस्त्यांना मिळणार पुनर्जीवन

## सर्वेक्षण करून देणार सांकेतिक क्रमांक, भूमी अभिलेख विभागाची घेणार मदत

**। जिल्हा प्रतिनिधी ।**

**शेताकडे जाणाऱ्या पाणंद रस्त्यावरून अनेकवेळा वाद विवाद होतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न आता कायमचा सुटणार आहे. शेताकडे जाणारे पाणंद रस्त्यांना आता पुनर्जीवन मिळणार आहे. जिल्हयात विशेष अभियानाच्या माध्यमातून पाणंद रस्त्यांचा प्रश्न सोडवून ते रस्ते रहदारीसाठी मोकळे केले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.**



जिल्हा औद्योगिकरणाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. शेताकडे जाणारा पाणंद रस्ते बंद झाल्याने अनेक वेळा दोन गटात वाद होतात. रस्त्यासाठी महसूल विभागासह न्यायालयात धाव घेतली जाते. दिवाणी व महसूल न्यायालयात गेल्याने वेळही व खर्चही अधिक वाढतो. हे प्रश्न कायमचे सोडविण्यासाठी सरकारने पाणंद रस्ते सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. पायवाटा, गाडीवाटा असलेल्या रस्त्यांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. गाव फेरी करून तलाठी, ग्रामसेवक इतर कर्मचाऱ्यांच्या मदतीने यादी तयार केली जाणार आहे. नकाशावर असलेले व नकाशावर नसलेल्या सर्व पाणंद रस्त्यांची नोंद करून त्या रस्त्यांचे चिन्हांकन केले जाणार आहे. भूमी अभिलेख विभागाची मदत घेऊन जागेवरील रस्त्यांचे सिमा अक्षांश व रेखांशसह निश्चिती करण्यात येणार आहे. त्यांना सांकेतिक क्रमांक दिला जाणार आहे. तलाठी दप्तरी नोंद कायमची राहणार आहे. त्यामुळे पाणंद रस्त्यावरून भविष्यात वाद झाल्यास त्या दप्तर नोंदीवरून हा वाद मिटविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जावळे यांनी दिली.

### स्मशानभूमींची होणार जिओ टॅगिंग

**जिल्ह्यातील काही स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता शेड नाही, असे अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाला आहे. स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यासह शेड उपलब्ध व्हावी, म्हणून प्रयत्न केले जाणार आहे. स्मशानभूमीची जीओ टॅगिंग करण्यात येणार आहे. तसेच शेडसह स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची व्यवस्था केली जाणार आहे. जिल्हा नियोजनकडून निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले.**

### दाखले मिळणार शाळेतच

**शाळा, महाविद्यालयात शिकणाऱ्या उत्पन्न दाखल्यापासून जातीच्या दाखल्यांची गरज मोठ्या प्रमाणात निर्माण होते. तालुका, जिल्हयाच्या ठिकाणी दाखल्यांसाठी धावाधाव करावी लागते. विद्यार्थ्यांना दाखले तात्काळ मिळावे, विद्यार्थी व पालकांची धावपळ कमी व्हावी म्हणून शाळा महाविद्यालयात एक सेतू केंद्र उभारला जाणार आहे. जिल्ह्यात सुरुवातीला १५ शाळांची निवड करण्यात आली आहे. कॉलेज तेथे सेतू केंद्र संकल्पना असणार आहे. त्यामुळे आता शाळा, महाविद्यालयातच दाखले मिळणार आहेत.**

> **“शेताकडे जाण्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी पाणंद रस्ते विषयक मोहीम शासनाने सुरू केली आहे. त्याची अंमलबजावणी जिल्ह्यात सुरू करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.**
> **– किशन जावळे, जिल्हाधिकारी”**

## माणगाव ग्रामीण पतसंस्थेतर्फे मदत

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील इंदापूर बाजारपेठेतील आगीत भस्मसात झालेल्या दुकानांच्या दुकानदारांना रायगड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील नामांकित पतसंस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेतर्फे प्रत्येकी १० हजार रुपयांची आर्थिक मदत सोमवार (दि.१५) सप्टेंबर रोजी देण्यात आली. इंदापूर बाजारपेठेत मुंबई–गोवा महामार्गालगत असणाऱ्या दुकानांना शनिवार (दि.६) सप्टेंबर रोजी मध्यरात्री आग लागली होती. या आगीत तीन दुकाने जळून पूर्णपणे भस्मसात होऊन या दुकानदारांचे लाखो



रुपयांचे नुकसान झाले होते. या संकटग्रस्त दुकानदारांना माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था या संस्थेतर्फे आगीत भस्मसात झालेल्या दुकानांचे दुकानदार पारस पेकाजी परमार, अमित गणेशमल ओसवाल व शाम कदम यांना प्रत्येकी दहा हजार रुपयांचा आर्थिक मदतीचा धनादेश संस्थेचे चेअरमन आनंद यादव, दिलीप जाधव, दिलीप अंबुर्ले, उदय म्हशेळकर, संदीप खरंगटे, पुंडलिक गायकवाड, राजेश सकपाळ, मयूर केकाणे, मनोज अहिरे यांच्या उपस्थितीत धनादेश देण्यात आला. माणगाव ग्रामीण पतसंस्थेने या संकटग्रस्त दुकानदारांना मोलाची आर्थिक मदत केल्याने या सर्व दुकानदारांनी पतसंस्थेचे आभार व्यक्त केले.

### उरणमध्ये पंचायतराज अभियान

**उरण :** ग्रामविकास विभागाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळा मंगळवार (दि.९) रोजी पंचायत समिती कार्यालय, उरण येथे गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या अभियानाचा उद्देश जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देऊन त्यांची कामगिरी अधिक प्रभावी करणे, शासकीय योजनांची अंमलबजावणी जलदगतीने करून त्यांचा लाभ गावागावात शेवटच्या घटकांपर्यंत पोहचवणे हा आहे.




## राजपूरीत मोफत आरोग्य शिबीर

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड यांच्यातर्फे राजपूरी ग्रामपंचायतीच्या सहकार्याने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये मुंबई येथील नामांकित डॉक्टरांनी ग्रामस्थांची तपासणी करून योग्य उपचार केले. या शिबिरात डॉ.करनकुमार वाघमारे, डॉ. दिशा गोपाळकृष्ण, डॉ. सुयश विरकर यांनी आरोग्यविषयक माहिती देऊन मोफत तपासणी केली. याप्रसंगी सिद्धाली नागवेकर, डॉ. सिद्धेश शिंदे, तनिषा भायदे, निलेश पाटील, प्राजक्ता आडुळकर, अरुंधती पिळणकर यांनी परिश्रम घेतले.

## पालीतील मुलींच्या शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश सुरु

**। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय विभागाच्या पाली–सुधागड मधली आळी येथील मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकिय वसतिगृहात सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात मोफत प्रवेश सुरु झाले आहेत. इयत्ता ८ वी पासून गरीब, हुशार, होतकरु, मागासवर्गीय अनु.जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय विशेष मागास प्रवेग, आर्थिकदृष्टया मागास, अनाथ व अपंग गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थिनींकरिता मोफत निवासव्यवस्था असून नाष्टा, अभ्यासाकरिता लागणारी वहया, पुस्तके, शैक्षणिक व लेखन साहित्य देखील विनामुल्य पुरविले जाते. तसेच दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता म्हणून ६०० रुपये निर्वाह भत्ता दिला जातो. शालेय व गणवेश पात्र महा. विदयार्थिनींना दोन संचाकरिता गणवेष भत्ता, रेनकोट–छत्री भत्ता दिला जातो. या व्यतिरिक्त संगणक, ग्रंथालय सुविधा, क्रिडासाहित्य, मनोरंजन आदी सुविधा उपलब्ध आहेत.

### सेवा पंधरवड्याचे आयोजन

**रायगड :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानंतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म दिवस बुधवारी(दि.१७) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती (दि. २) ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यात सेवा पंधरवडा साजरा केला जाणार आहे. १७ ते २२ सप्टेंबर या कालावधीत पाणंद रस्तेविषयक मोहिम, २३ ते २७ सप्टेंबर या कालावधीत सर्वांसाठी घरे तसेच २८ सप्टेंबर ते दोन ऑक्टोबर या कालावधीत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला जाणार आहे. त्याचा शुभारंभ माणगावमध्ये होणार आहे.

## किशोरवयीन मुलींसाठी बालसुरक्षा कार्यक्रम

**। सोगाव । प्रतिनिधी ।**

द लाईफ फाऊंडेशनतर्फे पोलीस विभाग व आयसीडीएस यांच्या सहकार्याने किशोरवयीन मुलींसाठी अलिबाग पोलीस ठाण्यात शैक्षणिक भेट व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होते. राजिप शाळा वाडगाव, नवगाव व चोंढी येथील एकूण ४९ किशोरवयीन मुली, शिक्षक चित्रा भोईर, सुगंधा पाटील, निर्मला कुचिक, शर्मिला पिंगळे, सामीया पेरेकर, भाग्यश्री पाटील, कल्पिता सालावकर, दिप्ती मोकल, विनोदिनी मोकल, अंगणवाडी सेविका व मदतनीस सहभागी झाल्या होत्या.



अनुराधा गोखले यांनी बालसुरक्षा उपाययोजना व शिक्षणाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. अ‍ॅड. तनुष्का पेडणेकर यांनी ‘गुड टच–बॅड टच’ यावर संवाद साधला तसेच १०९८ चाईल्ड लाईन या सेवेची माहिती दिली. उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांनी मुलींना अभ्यासाचे महत्त्व, नियमित वाचन, खेळाकडे लक्ष देण्यास सांगितले. शर्मिला पिंगळे यांनी मुलींना शिक्षण व मेहनतीचे महत्त्व समजावून सांगत समाजात सन्मानाने जगण्यासाठी अभ्यासाची गरज अधोरेखित केली. द लाईफ फाउंडेशनचे कार्यक्रम व्यवस्थापक शिलानंद इंगळे, प्रणय ओव्हाळ, राखी राणे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

## आज मुंबईत धडकणार भीम सैनिक

### हजारो अनुयायी सामील होणार जन आक्रोश आंदोलनात

**। जिल्हा प्रतिनिधी ।**

बुध्दगयातील महाबोधी महाविहार, महू जन्मभूमी आणि दिक्षाभूमी मुक्तीसाठी भारतीय बौध्द महासभेच्या वतीने जन आक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे. मुंबईमधील आझाद मैदानात बुधवारी (दि.१७) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास भीम सैनिक धडक देणार आहेत. रायगड जिल्ह्यातून हजारोच्या संख्येने बुध्द अनुयायी या आंदोलनात सहभागी होणार असल्याची महिती भारतीय बौध्द महासभा जिल्हा शाखा रायगड उत्तरचे अध्यक्ष सुशील वाघमारे यांनी दिली.

भगवान बुध्द यांना बुध्दत्व प्राप्त झाले. त्या बुध्दगयातील महाबोधी महाविहार जागतिक बौध्दांचे श्रध्दास्थान आहे. या भूमीवर झालेल्या अतिक्रमणाविरोधात भारतीय बौध्द महासभेने एल्गार पुकारला आहे. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भिमराव आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली जन आक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाची तयारी गेल्या अनेक दिवसांपासून जिल्हा भारतीय बौध्द महासभा उत्तर शाखा रायगडच्या वतीने बैठकांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. जिल्हा, तालुका स्तरावर बैठका घेत या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा अध्यक्ष सुशील वाघमारे यांनी केले.

मुंबईत होणाऱ्या जन आक्रोश आंदोलनात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील भीम व बौध्द अनुयायींनी तयारी केली आहे. काहीजण मंगळवारी तर काही जण बुधवारी सकाळी मुंबईला रवाना होणार आहेत. भारतीय बौध्द महासभेचे जिल्हा, तालुका, शहर, वार्ड, ग्रामशाखेचे पदाधिकारी, सभासद, केंद्रीय शिक्षक, श्रामणेर, बौध्दाचार्य, समता सैनिक दलाचे अधिकारी, जवान असे जिल्हयातून हजारोच्या संख्येने अनुयायी आंदोलनात सहभागी होतील असे सुशील वाघमारे यांनी सांगितले आहे.

## अतिक्रमित घरे होणार नियमित

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शासकिय जमीनीवरील अतिक्रमण नियमीत करण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. प्राथमिक पडताळणीनुसार जिल्ह्यातील ९९३ घरे आहेत. एक जानेवारी २०११ पुर्वी राहत असलेली रहिवासी पुरावे, दाखल्यांची तपासणी करून मालकी हक्काचे पट्टे दिले जाणार आहे. अतिक्रमण झालेल्या घरे नियमीत करण्यासाठी प्रशासनाकडे निवेदन देणे. त्या जागेची मोजणी करणे. त्याचा आराखडा तयार करणे. उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत मंजूरी देणे. त्यानंतर मालकी हक्काचे पट्टे देण्याचे काम केले जाणार आहे. मात्र, सिडकोच्या कार्यक्षेत्रात असलेल्या घरांबाबत शासनाकडून मार्गदर्शन मिळवून पुढील कार्यवाही केली जाईल.

सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत ग्रामीण व शहरी भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी तरतुदींची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

**स्थानिकांमध्ये नाराजीचा सूर | कामगारांची सततची रहदारी**

# रस्त्यांवर चालणे झालेय कठीण

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

**दरवर्षी पावसाळ्यात रस्त्यांची मोठया प्रमाणावर वाताहत होत असते. यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येते. परंतु, यावेळी रस्त्यांचे चक्क नाले झालेले दिसत आहेत तरी प्रशासन ढुंकूनही पहात नसल्याने खड्डेमय रस्त्यावरून चालताना वयोवृद्ध व्यक्तींना, शालेय विद्यार्थ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.**

लुईझा पॉईंट रोड त्याचप्रमाणे रग्बी विभाग, सनसेट पॉईंटकडे जाणारा मॅलेट स्प्रिंग रोड या भागात असंख्य बंगले असून त्याठिकाणी माळी कामगारांची सततची रहदारी चालू असते.



रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्यामुळे ३ मार्च २०२५ रोजी रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वीच पूर्ण करावीत जेणेकरून आम्हाला आमच्या मुलाबाळांना, ज्येष्ठांना चालणे सोयीचे होईल यासाठी नगरपरिषदेच्या कार्यालयात लेखी निवेदन देण्यात आले होते.

परंतु, या रस्त्यावर संबंधित कर्मचारी वर्गाकडून त्यावेळेस फक्त रस्त्यांची झाडलोट करण्यात आली होती रस्त्यावर दगडगोटे तसेच पडून होते.

पावसामुळे दगडगोटे रस्त्यावर विखुरलेल्या अवस्थेत असल्याने रस्त्याला चर पडले असून नगरपरिषदेच्या माध्यमातून जे काही प्लास्टिक गोण्यांचे बंधारे टाकले होते ते सुद्धा या पावसाळ्यात तग धरू शकले नाहीत.

> **“रस्त्यावरून आम्हाला दररोज यावे लागते. दगडगोट्याच्या या रस्त्यावर मुलांना शाळेत जाण्यासाठी खूपच त्रासदायक झाले आहे. पर्यटकांना सुध्दा याचा चालताना खूपच त्रास होतो आहे पायाला ठोकर लागून किरकोळ अपघात घडत असतात. आमच्या फार काही मोठया मागण्या नाहीत फक्त प्रशासनाने आमच्या या रस्त्याबाबतच्या किरकोळ समस्यांवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करावेत.**
> **– नंदकिशोर सनगरे**
> **माळी कामगार”**

गणेशोत्सव काळात सुध्दा गणेश दर्शनासाठी जाताना सर्वांना त्रासदायक बनले होते. रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी मातीचे उत्खनन करण्यास वनखात्याची आडकाठी असते त्यासाठी निदान किरकोळ दुरुस्ती करून रस्ते चालण्या योग्य केल्यास आम्हाला सोयीचे होईल, तसेच शाळेतीलमुलांना ज्येष्ठांना सोईचे होईल असे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



## जाहिर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. किशोर बाबु आसवले रा. खोपोली ता. खालापूर जि. रायगड व श्री. सुनील दत्तात्रेय आंग्रे रा. मोठे वेणगांव ता. कर्जत जि. रायगड यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत ही खरेदी घेण्याचे ठरविले आहे त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

| गावाचे नांव | मालकाचे नांव | सर्व्हे नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| मुगपे ता. कर्जत जि. रायगड | मनीषा राजेश काकडे<br>संतोष व्यंकटेश शिंदे | १६/१/अ | १.३४.००<br>पो.ख. १.०७.००<br>एकुण २.४१.०० | ०.९५ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत ही वरील नमुद जमिन मालकांडून आमचे अशिल यांनी कायम मालक म्हणुन विकत घेण्याचे ठरविले आहे तरी सदरहु जमिनीचा टायटल सर्चचा भाग म्हणुन प्रस्तुतची नोटीस दिली असुन सदर व्यवहारास कुणाचाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास ती हरकत लेखी व कागदोपत्री पुराव्यासह मी खाली सही करणार याचे पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ दिवसांचे आत दाखल करावी. मुदतीत न आलेल्या हरकती व पुराव्यांशिवाय आलेल्या हरकती माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व मग सदर व्यवहारास कुणाचीही कुठल्याही प्रकारची हरकत नाही वा असलेल्या हरकती सोडुन दिल्या आहेत असे समजून माझे अशील सदर जमिन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व सदर व्यवहार सर्व संबधितांवर बंधनकारक राहील याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि. १७/९/२०२५ — अशिलातर्फे वकील

पत्ता
धापया मंदीरा समोर देशमुख हाउस
दगडे अळी ता. कर्जत, जि. रायगड

**ॲड. भारती निवृत्ती ढाकवळ**
मो. नं. ९२७३४९९४३८, ९९२१२९६४६६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. समीर रमेश पाटील व श्री. रविंद्र जयंतराव शिंदे यांचे कडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोळगांव, ता. अलिबाग येथील**

| गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| १५३ | ०-२४-८० | ६.०७ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १६/०९/२०२५

**ॲड.अक्षय सुधीर म्हात्रे**
''अन्नपूर्णा'', मु. पो.धोकवडे,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे सावळे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| श्रीरंग यशवंत लळीत | ६ | १८/ब | ०-२०-०० | ० | २० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. — सही /-

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१ ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १७/०९/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७

## पनवेल महानगरपालिका
### अग्निशमन विभाग
### दरपत्रके मागविण्यास सुचना

पनवेल महानगरपालिका खालील कामासाठी इच्छुक संस्था यांचेकडून जाहिर मोहोर बंद दरपत्रके मागवित आहेत. इच्छुकांनी परिपुर्ण भरलेली अंदाज दरपत्रके सीलबंद करुन दिनांक १७/०९/२०२५ रोजी पासुन दिनांक २४/०९/२०२५ रोजी पर्यंत दु. ३.०० वाजेपर्यंत महापालिकेच्या अग्निशमन विभागात सादर करावीत. सदर तारखेनंतर प्राप्त झालेली कोणतीही दरपत्रक स्वीकारले जाणार नाही. प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २५/०९/२०२५ रोजी उप आयुक्त यांच्या दालनात दरपत्रक धारक अथवा त्यांचे समक्ष सायं. ०४.०० वा. उघडणेत येतील.

| अ क्र. | साहित्याचे वर्णन/ कामाचे नाव | नग | दर प्रती नग | एकुण दर जी.एस.टी सह |
|---|---|---|---|---|
| १ | Foam Can (Foam Concentrate Can) | १०० नग २० लि. प्रति कॅन | | |
| | एकूण | | | |

**अटी व शर्ती :-**
१) दुकान नोंदणी प्रमाणपत्र व GST,पॅनकार्ड नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.
२) सर्व नमूद जीएसटी/व्हॅट/वाहतूक खर्च यांसह नमूद असावेत.
३) सदरकामी वापरण्यात येणारे साहित्य चांगल्या प्रतीचे वापरले जावे अन्यथा साहित्य स्वीकारले जाणार नाही.
४) याकामी निव्वळ दरपत्रके मागणी करीत असल्याने याबाबत कोणत्याही अटी सदरचा विभाग बांधील असणार नाही.

जा.क्र./पमपा/अग्नि/२६२५/प्र.क्र./१६४८/२०२५
दिनांक : १६/९/२०२५
ठिकाण :- पनवेल महानगरपालिका, पनवेल.

**कैलास गावडे**
**उपआयुक्त मुख्यालय**
**पनवेल महानगरपालिका**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सूचना क्रमांक ३७/२०२५-२०२६ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामाकरीता ई-निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रूपये |
|---|---|---|
| १. | विळेभागाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...विळेभागाड येथील जलशुद्धीकरण केंद्रातील कार्यालयासाठी अंतर्गत व्यवस्था पुरविणे. (दुसरी मागणी) | रू.३८,५४,८६०.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १८/०९/२०२५ ते दिनांक २९/०९/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी सदर कामाबाबत दिनांक १९/०९/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमूद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक २२/०९/२०२५ पासून वर नमूद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# नव भारत साक्षरता अभियान सुरू

। खरोशी । प्रतिनिधी । केंद्र शासन पुरस्कृत नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत राज्य शासनामार्फत संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असून पेण तालुक्यात गट शिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम पद्धतीने सूरू आहे.

तालुक्यात ९९९ एवढ्या निरक्षरांची नोद झाली असून तांत्रिक कारणास्तव ३०५ असाक्षरांची ऑफलाईन नोंद झाली. या विषया संदर्भात राज्य स्तरीय, जिल्हास्तर, तालुकास्तर केंद्रस्तर व शाळास्तर या पद्धतीने शिक्षक स्वयंसवेकांचे प्रतिक्षिण शाळा स्तरावर झाले आहे. प्रत्येकी १० असाक्षरांसाठी १ स्वयंसेवक काम करत आहेत. सदर असाक्षरांसाठी २१ सप्टेंबर रोजी शासनामार्फत लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर परीक्षा त्या-त्या शाळेवर घेण्यात येणार असून परीक्षेसाठी शाळा हेच केंद्र असणार आहे शासनामार्फत प्रश्नपत्रिका पुरविण्यात येणार आहेत.

## जाहिर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या निर्देशानुसार याखाली लिहण्यात आलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक विशेषत: वर्णन करण्यात आलेल्या जमिनीचे (**"मालमत्ता"**) अधिकार, मालकी हक्क, हिस्सा आणि हितसंबंधाबाबत १५२–ए, १५वा मजला, ब्रिज कुटीर सहकारी गृहनिर्माण संस्था, ६८–ए, रुंगटा लेन, नेपियन सी रोड, रीजन्सी हॉटेलच्या समोर, मलबार हिल, मुंबई – ४००००६ हा पत्ता असणारे **सतीश वल्लभदास सुतारिया ("मालक")** यांच्या मालकी हक्काची आम्ही चौकशी करीत आहोत.

मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये मालकाचे अधिकार, मालकी हक्क, हिस्सा किंवा हितसंबंधाविरुद्ध किंवा त्यासंबंधात कोणताही दावा आणि/किंवा मागणी असलेल्या सर्व व्यक्तींचा, याच्या पुढे किंवा अंतर्गत कोणत्याही विक्री, हस्तांतरण, नियुक्ती, भेट, विनिमय, भाडेपट्टी, परवानगी आणि परवाना, कुळ, ताबा, वापर, वहीवाट, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार, संपादन, मागणी, मुखत्यारपत्र, प्रलंबित दावे, गहाण, धारणाधिकार, भार, गृहीतक (प्राप्तीच्या मार्गासह), तारण, हमी, कर्ज, ऋण, आगाऊ रक्कम, वारसा, योजना, वसीहत, विभाजन, तडजोड, किंवा कोणत्याही कॉर्पोरेट स्ट्रक्चरिंग किंवा रीस्ट्रक्चरिंग (कोणत्याही विलीनीकरण, डिमर्जर, दिवाळीखोरी, लिक्विडेशन, किंवा अन्यथा सह), किंवा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणाचा किंवा लवादाचा कोणत्याही जप्ती, मनाई हुकूम, डिक्री, आदेश, निर्णय, किंवा निवाडा अंतर्गत किंवा कोणत्याही करार, सामंजस्य करार, टर्म शीट आणि/ किंवा इतर कोणताही डीड किंवा दस्तऐवज (एकतर कोणत्याही खटल्यात आव्हान दिलेले किंवा अन्यथा) अंतर्गत किंवा जमिनीच्या संदर्भात किंवा संबंधित कोणताही दावा किंवा मागणी असल्यास, जो मालकाचे अधिकार, मालकी हक्क किंवा हितसंबंधा विरुद्ध किंवा विसंगत असल्यास किंवा जरी इतर कोणतेही अधिकार, मालकी हक्क, मागणी, दावा किंवा हितसंबंध (एकत्रितपणे **"दावे"**) असल्यास, त्यांनी याद्वारे आम्हाला आमचे कार्यालय खैतान ॲण्ड कंपनी, वकिल, वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर–१सी, १३वा मजला, ८४१ सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. देवेंद्र देशमुख यांना लक्षवेधासाठी चिन्हांकीत करुन) या ईमेल सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा)** दिवसांच्या कालावधीत ज्याच्या आधारावर असे दावे, मागणी किंवा हक्क केले जात आहेत अश्या सर्व कागदोपत्रांच्या प्रतींसहीत लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे.

जर उपरोक्त कालावधी संपण्यापुर्वी कोणताही दावा प्राप्त झाला नाही तर असे गृहीत धरले जाईल की असा कोणताही दावा अस्तित्वात नाही किंवा असा दावा, जर असेल तर, तो माफ केला आहे आणि / किंवा सोडुन दिला गेला आहे आणि तो मालकावर बंधनकारण राहणार नाही.

**येथे वर संदर्भित अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

गाव सार्तीजे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्रमांक १३२/२ असलेल्या एकूण २,४१० चौरस मिटर्सची बिगरशेती जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड. जमिनीच्या चर्तु:सीमा खालिलप्रमाणे आहेत:

उत्तरेकडे वा त्या दिशेला : गट क्रमांक १३२ असलेल्या जमिनीचा उर्वरीत भाग
पुर्वेकडे वा त्या दिशेला : सार्तीजे गावातील गट क्रमांक १३३ असलेल्या जमिनीची सीमा
दक्षिणेकडे वा त्या दिशेला : गट क्रमांक १३२ असलेल्या जमिनीचा उर्वरीत भाग
पश्चिमेकडे वा त्या दिशेला : सार्तीजे गावातील गट क्रमांक १३१ असलेल्या जमिनीची सीमा

आज दिनांक १७ सप्टेंबर २०२५

**खैतान ॲन्ड कंपनी करीता**
सही/-
**देवेंद्र देशमुख**
**भागीदार**

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने, प्रादेशिक सिग्नल व दूरसंचार अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा ही एस अँड टी इन्स्टॉलेशनसाठी अर्थिंग, बॉन्डिंग, सर्ज व वीज संरक्षण प्रणाली उपलब्ध करून देणे यासाठी असून, ही कामे आरडिएसओ दस्तऐवज क्रमांक एसटीएस/ई/टिएएन 3006 आवृत्ती 3.0 दिनांक 08.01.2025 नुसार, कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील 16 स्थानकांवर करण्यात येणार आहेत. **निविदा सूचना क्र. केआर-आरएन-एसजी-टी-06ए-2025-26 दिनांक 17.09.2025. अनुमानित खर्च** : ₹ 55.11 लाख (जीएसटी सहित). **ईएमडी रक्कम** : ₹ 1,10,200/-. **बोली सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ** : 08.10.2025 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी www.ireps.gov.in संकेतस्थळावर भेट द्यावी.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम )

सादर सेवा

बेलापूर भवन, प्लॉट क्र. 6, सेक्टर 11, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - 400 614

### रोजगार अधिसूचना

कोंकण रेलवे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे द्वारे नियमित आधारावर 7व्या सीपीसी च्या पे मॅट्रिक्स लेवल-8 (रु. 47600- 151100) मध्ये खालील पदांसाठी **रोजगार अधिसूचना क्र. सीओ/पी-आर/07/2025 दिनांक 11.09.2025** प्रसिद्ध करण्यात आली आहे :

| पद | रिक्त जागा | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | यूआर | ओबीसी-एनसीएल | एससी | |
| सहाय्यक अभियंता (सिव्हिल) | 01 | - | - | 01 |
| सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | 01 | - | - | 01 |
| सहाय्यक व्यवस्थापक/माहिती तंत्रज्ञान | 01 | - | - | 01 |
| सहाय्यक वाहतूक व्यवस्थापक (परिचालन व वाणिज्यिक) | 02 | 01 | 01 | 04 |
| सहाय्यक साहित्य व्यवस्थापक | 01 | 01 | - | 02 |
| सहाय्यक यांत्रिक अभियंता | - | 01 | - | 01 |
| सहाय्यक सिग्नल व दूरसंचार अभियंता | - | - | 01 | 01 |
| सहाय्यक वित्तीय सल्लागार | - | 01 | 01 | 02 |
| सहाय्यक विद्युत अभियंता | - | 01 | - | 01 |
| सहाय्यक कार्मिक अधिकारी | 01 | - | - | 01 |
| सहाय्यक उप महाव्यवस्थापक | 01 | - | - | 01 |

उमेदवार अधिसूचना, पात्रता निकष इत्यादी तपशील केआरसीएलच्या वेबसाइट **www.konkanrailway.com** वर लिंक → **Recruitment** → **Current Notifications** →**Notifications** येथे पाहू शकतात व त्यानुसार अर्ज करू शकतात.

**मुख्य कार्मिक अधिकारी**

RNI No.MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन राजपत्र
**असाधारण भाग चार-ब**

वर्ष ११, अंक ११८) गुरुवार, ऑगस्ट २१, २०२५/श्रावण ३०, शके १९४७ (पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २९६**
**प्राधिकृत प्रकाशन**
**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ ऑगस्ट, २०२५.**

### अधिसूचना

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम,**

क्रमांक-खाक्षेस-२०२२/प्र.क्र. २१६/रस्ते-८.- महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा अधिनियम क्र. ५५) च्या कलम ३ नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन अधिसूचना क्र. खाक्षेस २०२२/ प्र.क्र.२१६/रस्ते-८, दिनांक २४ एप्रिल, २०२३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

उक्त अधिसूचनेतील अधिसूचीमध्ये अनुक्रमांक १७१४ च्या नोंदीनंतर खालील नोंदी समाविष्ट केल्या जातील.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गावाचे नाव | सर्व्हे नं/गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. | क्षेत्र आर. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १७१४ अ | रायगड | मुरुड | सावली | २४३ | | ० | २.०४ |
| | रायगड | मुरुड | सावली | २३७ | - | ० | १.३६ |
| | रायगड | मुरुड | सावली | १८९ | - | ० | ५.३६ |
| | रायगड | मुरुड | सावली | १८० | - | ० | १९.१५ |
| | रायगड | मुरुड | सावली | १८१ | - | ० | ०.१६ |
| | रायगड | मुरुड | सावली | १८२ | - | ० | ०.९३ |
| १७१४ अ | रायगड | मुरुड | सावली | १८३ | - | ० | ३.३६ |
| | रायगड | मुरुड | सावली | १८४ | - | ० | २.८ |
| | रायगड | मुरुड | सावली | १८५ | - | ० | १.४ |
| | रायगड | मुरुड | सावली | १८६ | - | ० | १.८७ |
| | रायगड | मुरुड | सावली | २२४ | - | ० | ०.४३ |
| | रायगड | मुरुड | सावली | १८७ | - | ० | ०.१७ |
| | रायगड | मुरुड | सावली | १७९ | - | ० | ९.२२ |
| | रायगड | मुरुड | सावली | १८८ | - | ० | ११.८५ |
| | रायगड | मुरुड | सावली | १९० | - | ० | १३.९३ |
| | रायगड | मुरुड | सावली | १४० | - | ० | २.९ |
| | रायगड | मुरुड | सावली | १९१ | - | ० | ६.३६ |
| | रायगड | मुरुड | सावली | १९२ | - | ० | २.४१ |
| | रायगड | मुरुड | सावली | १२३ | - | ० | २८.०५ |
| | रायगड | मुरुड | सावली | ११० | - | ० | ३.९५ |
| | रायगड | मुरुड | सावली | १२४ | - | ० | ०.६५ |
| | रायगड | मुरुड | सावली | १२२ | - | ० | ४.०२ |
| | रायगड | मुरुड | सावली | १२१ | - | ० | ०.४७ |
| | रायगड | मुरुड | सावली | १२० | - | ० | ०.८८ |
| | रायगड | मुरुड | सावली | ११९ | - | ० | १.७५ |
| | रायगड | मुरुड | सावली | ३९६ | - | ० | ४.७२ |
| | रायगड | मुरुड | सावली | ११४ | - | ० | १२.३९ |
| | रायगड | मुरुड | सावली | १११ | - | ० | ०.५४ |
| | रायगड | मुरुड | सावली | ११२ | - | ० | ४.२९ |
| | रायगड | मुरुड | सावली | १०३ | - | ० | ११.८७ |
| | रायगड | मुरुड | सायली | ११३ | - | ० | ७.१ |
| | रायगड | मुरुड | सावली | १०६ | - | ० | ०.०७ |
| | रायगड | मुरुड | सावली | १०० | - | ० | २.५४ |
| | रायगड | मुरुड | सावली | १०२ | - | ० | १६.९५ |

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**सचिन चिवटे,**
**शासनाचे उप सचिव.**

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/१४६/१२०९/२०२५**

## जाहिर नोटिस

दि.१६/०९/२०२५

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचा बोलणी विद्यमान मालक नरेश बाळाराम वावेकर यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| श्रीगांव ता.अलिबाग | २६९/४ | ०-३०-००<br>पो.ख ०-०२-६०<br>एकुण ०-३२-६० | ५.२४ |

वर नमुद केलेली मिळकत जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.पेझारी (पळी आंबेघर) पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा. नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक श्रीमती. वंदना दत्तात्रेय सावंत व श्रीमती. अनिता अशोक सावंत यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| तळवली, ता. मुरूड जि. रायगड | १६५ | ०-२४-००<br>पो.ख.०-०७-१०<br>एकूण ०-३१-१० | २.५६ |

वर वर्णन केलेली संपुर्ण मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १६/०९/२०२५

सही/-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु. पो. चिंचोटी
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

## जाहीर नोटीस

दिनांक १५/०९/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे मोग्रज, ता. कर्जत, जि.रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री. रोशन नारायण शिरढोणकर | १३/२/ब/१ | एकुण क्षेत्र ३.४७.०० यापैकी लिहुन देणार यांच्या हिश्याची मिळकत ०.२०.०० | ०.१६ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. पूजा प्रताप सुर्वे**
रा. पळसदरी, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९२७१८७६०५०

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# आयसीसीचा पीसीबीला दणका

## पाकिस्तानला तोंडावर आपटण्याची वेळ

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशिया चषक २०२५ सामन्यात भारताने ७ गडी राखून विजय मिळवला. मात्र, हा सामना जिंकल्यावर भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन टाळले होते. याबाबत पाकिस्तानने आयसीसीकडे तक्रार केली; परंतु, आयसीसीने ती तक्रार नाकारली आहे. त्यामुळे पाकिस्तानला आता तोंडावर आपटण्याची वेळ आली आहे.**

दुबईत रविवारी (दि.१४) भारत आणि पाकिस्तान संघात आशिया चषक स्पर्धेतील सामना पार पडला. या सामन्यात भारताने विजय मिळवला असून हा सामना वादग्रस्त ठरला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर हा सामना झाल्याने आधीच या सामन्याला मोठ्या प्रमाणात विरोध झाला होता. त्यातच सामन्यात भारतीय संघातील खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंची कोणत्याही प्रकारे संबंध ठेवण्याचे टाळले. भारतीय संघाने पाकिस्तान संघातील सदस्यांशी सामन्यानंतर हात न मिळवण्याचा निर्णयही घेतला होता. इतकेच नाही, तर सामन्यापूर्वी भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आघा यांच्यातही नाणेफेकीवेळी हस्तांदोलन झाले नव्हते. यावरून बरीच चर्चा झाली. त्यामुळे या घटनेवरून पाकिस्तान क्रिकेट वर्तुळातून प्रचंड नाराजी आणि राग व्यक्त करण्यात आला.

या प्रकरणात पाकिस्तानने अगदी भारताविरुद्ध तक्रार करण्यापर्यंत हिंमत केली. आता यावर जय शाह अध्यक्ष असलेल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने पाकिस्तानलाच धक्का देत त्यांची तक्रारच नाकारली आहे. पाकिस्तानने भारतीय संघाने हस्तांदोलन टाळल्याच्या घटनांमुळे आयसीसीकडे सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांच्याविरुद्ध तक्रार केली होती. पाकिस्तानने म्हटले होते की, नाणेफेकीवेळी पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आघाला भारतीय कर्णधारासोबत हस्तांदोलन करू नको, हे सांगण्यात त्यांची भूमिका होती. तथापि, आता आयसीसीने या तक्रारीवर प्रतिक्रिया दिली असून त्यांनी त्यांची मागणी अमान्य केली आहे. आयसीसीने म्हटले आहे की, नाणेफेकीवेळी दोन्ही संघांच्या कर्णधारांमध्ये हस्तांदोलन होणार नाही, हे आशियाई क्रिकेट परिषदेच्या अधिकाऱ्यानेच पायक्रॉफ्ट यांना कळवले होते. त्यामुळे त्यांनी तसे सांगितले. आता आयसीसीने दिलेल्या अधिकृत पत्रामुळे या वादाला पूर्णविराम मिळाला आहे. तसेच, सामनाधिकारी भारतीय संघासाठी काम करत असल्याचा पाकिस्तानचा गैरसमजही खोटा ठरला आहे.

### चषकावर बहिष्कार टाकण्याची धमकी

**पाकिस्तानी माध्यमांमधील वृत्तांनुसार, पायक्रॉफ्टला काढून टाकले नाही तर पाकिस्तानने स्पर्धेतून माघार घेण्याची धमकी दिली आहे. कारण १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या युएईविरुद्धच्या सामन्यातही पायक्रॉफ्ट हेच सामनाधिकारी आहेत. परंतु, पीसीबीचे प्रमुख मोहसिन नक्वी हे आशियाई क्रिकेट परिषदेचे सध्याचे प्रमुख असल्याने हे अशक्य दिसत आहे. त्यामुळे आता आयसीसीच्या निर्णयानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्ड काय निर्णय घेणार, हे पाहावे लागणार आहे. कारण सुपर फोर फेरीत प्रवेशासाठी या दोन्ही संघातील सामना 'करो वा मरो' असा आहे.**

### भारतीय संघ चषक उंचावणार नाही?

**पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या विधानावर बीसीसीआयने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही; परंतु, असे मानले जाते की जर भारतीय संघ २८ सप्टेंबर रोजी अंतिम फेरीत पोहोचला तर भारताचे खेळाडू नक्वीसोबत व्यासपीठ शेअर करणार नाहीत. एसीसी प्रमुख असल्याने नक्वी चॅम्पियन संघाला चषक देऊ शकतात. त्यामुळे, भारतीय संघाने आशिया चषकातील अंतिम सामना जिंकल्यावरही भारतीय खेळाडू घेणार की नाहीत, यावर अद्याप प्रश्नचिन्ह आहे.**

# तेजस शिरसेचे स्वप्न थोडक्यात भंगले

**| टोकियो | वृत्तसंस्था |**

जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेत प्रथमच सहभागी झालेल्या छत्रपती संभाजीनगरच्या तेजस शिरसेचे ११० मीटर हर्डल्स शर्यतीत उपांत्य फेरी गाठण्याचे स्वप्न थोडक्यात भंग झाले. त्याचप्रमाणे महिलांच्या ३ हजार मीटर स्टीपलचेस शर्यतीत पारुल चौधरी आणि पुरुषांच्या लांब उडीत श्रीशंकर मुरलीचे आव्हानही प्राथमिक फेरीतच आटोपले आहे.



गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने आपल्या कामगिरीत सुधारणा करणाऱ्या २३ वर्षीय तेजसने पाचव्या हीटमधून पळताना दक्षिण आफ्रिकेच्या अँतोनिओ अलकानानंतर वेगवान प्रारंभ केला. मात्र, नंतर त्याला आपला वेग कायम ठेवता आला नाही. त्याने १३.५७ सेकंदात शर्यत पूर्ण केली. उपांत्य फेरी गाठण्यासाठी त्याला किमान १३.५१ सेकंद वेळ नोंदविणे आवश्यक होते. तेजसची कारकिर्दीतील सर्वोत्तम वेळ १३.४१ सेकंद अशी आहे. दोन वर्षांपूर्वी बुडापेस्ट येथे अंतिम फेरी गाठणाऱ्या श्रीशंकर मुरलीलाही प्राथमिक फेरीचा अडथळा पार करता आला नाही. स्वीडनच्या मोंडो डुप्लांतीसने ६.३० मीटर अंतर पार करताना पोल व्हॉल्टमध्ये १४ व्या वेळेस विश्वविक्रमाची नोंद केली. ६.३० मीटरवर त्याने तिसऱ्या व शेवटच्या प्रयत्नात यशस्वी उडी मारली व सलग तिसरे विश्वविजेतेपद पटकावले. त्याचे हे प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील आठवे सुवर्णपदक आहे. त्यात ग्रीसच्या इम्यॅनुल करालीसने ६.०० मीटरसह रौप्य, तर ऑस्ट्रेलियाच्या कर्टिस मार्शलने ५.९५ मीटर उडी मारीत कांस्यपदक जिंकले.

# युवराज सिंहला ईडीचा समन्स

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय क्रिकेट विश्वातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. भारतीय क्रिकेट संघाचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंगच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. ईडीने पुन्हा एकदा युवराज सिंहला समन्स पाठवले आहे. २३ सप्टेंबर रोजी त्याची चौकशी होणार असून ऑनलाईन बेटिंग ॲपच्या प्रमोशन प्रकरणात ही चौकशी होणार असल्याची माहिती समोर येत आहे. महत्त्वाचे म्हणजे हरभजन सिंह, सुरेश रैना, रॉबिन उतप्पा यासारख्या मोठ्या क्रिकेटपटूंची नावे देखील या प्रकरणात पुढे आली आहेत. अशातच आता युवराज सिंहला चौकशीसाठी बोलवण्यात आल्याने विविध चर्चांनाही उधाण आले आहे.

ईडीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १एक्सबेट या ऑनलाईन बेटिंग ॲपच्या प्रमोशन संदर्भात ही चौकशी होणार आहे. यासाठीच युवराज सिंहला समन्स पाठवण्यात आले आहे. २३ सप्टेंबर रोजी दिल्लीतील ईडीच्या मुख्यालयात ही चौकशी होणार असल्याचे ईडीच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. युवराज सिंह व्यतिरिक्त रॉबिन उतप्पा आणि सोनू सूद यांनाही चौकशीसाठी बोलवण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, २२ सप्टेंबर रोजी रॉबिन उतप्पा आणि २४ सप्टेंबर रोजी सोनू सुदची चौकशी करण्यात येणार आहे. या प्रकरणात यापूर्वी सुरेश रैना आणि शिखर धवनची चौकशी करण्यात आली आहे. अशातच आता रॉबिन उतप्पा आणि युवराज सिंहची चौकशी होणार आहे. ईडीच्या मते, १एक्यबेट हे प्लॅटफॉर्म अवैध सट्टेबाजीला प्रोत्साहन देत आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे वेब लिंक आणि कोडद्वारे युजर्सना अवैध सट्टेबाजी साइटवर पाठवले जाते. हे सरळसरळ भारतीय कायद्यांचे उल्लंघन आहे. हे प्लॅटफॉर्म स्वत:ला स्किल-बेस्ड गेम म्हणून सादर करतात; परंतु, प्रत्यक्षात रिग्ड अल्गोरिदमचा वापर करून याद्वारे जुगार खेळला जातो.

## नेरळच्या बुडकोन अकॅडमीचे यश

**| नेरळ | प्रतिनिधी |**

मुंबई येथे ३६वी ऑल इंडिया कराटे चॅम्पियनशिप आयोजित केली होती. या स्पर्धेत नेरळ येथील बुडोकोन कराटे अकॅडमीचे खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेत मधुरा गवळी आणि परी गवळी यांनी दोन सुवर्णपदके पटकावली. तर, जय दिसले याने एक सुवर्ण आणि रौप्यपदक प्रज्ञेश ठोंबरे याने एक सुवर्ण आणि कांस्यपदक, स्वराज विरले याने एक रौप्य आणि कांस्यपदक, श्रेया गवळी हिने एक सुवर्ण आणि रौप्यपदक पटकावले आहे.

# आस्था थिटेची 'उत्तेजनार्थ' कामगिरी

**| खांब | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावची सुकन्या आस्था थिटे हिने राज्यस्तरीय वत्कृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले आहे. मुंबईतील अष्टपैलू संस्कृती कला अकादमी यांच्यावतीने ऑगस्ट महिन्यात स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून 'भारतीय स्वातंत्र्याचे महत्व' या विषयावर इयत्ता ७ वी व ८ वी या गटासाठी राज्यस्तरीय ऑनलाईन वत्कृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत संपुर्ण राज्यभरातून एकूण ९७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत आस्थाने केलेले उत्तम



सादरीकरण व वत्कृत्वशैलीच्या जोरावर उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले आहे. तिच्याबरोबर स्पर्धेत सहभागी झालेल्या दिशा हळदेला सहभाग सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या दोघी नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथील गुणवंत विद्यार्थीनी आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष महेंद्र पोटफोडे, सर्व संचालक मंडळ तसेच मुख्याध्यापक दिपक जगताप, सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग त्याचप्रमाणे विभागातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी अभिनंदन व्यक्त करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भारतीय संघ पाकिस्तानला वरचढः सौरव गांगुली

**| कोलकाता | वृत्तसंस्था |**

भारत विरुद्ध पाकिस्तान संघात रविवारी (दि.१४)झालेला आशिया चषकामधील सामना क्रिकेट वर्तुळात प्रचंड चर्चेचा विषय ठरला. या सामन्यात भारतीय संघ सर्वच क्षेत्रात पाकिस्तानला वरचढ ठरला. आता यावरून भारताचे माजी कर्णधार सौरव गांगुली यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

सौरव गांगुली यांनी म्हटले की, आता या दोन संघांच्या सामन्यात रोमांच राहिला नाही. पाकिस्तान संघ भारतीय संघाच्या तुलनेचा राहिलेला नाही. मी जे पाहिले, त्याने मला खरंतर आश्चर्य वाटले नाही. मी पहिल्या १५ षटकांनंतर हा सामना पाहण्याचे बंद केले आणि इंग्लिश प्रीमियर लीगमधील सामना पाहिला. ते पुढे म्हणाले की, पाकिस्तानची तुलनाच होऊ शकत नाही, मी हे वाईट हेतूने बोलत नाही. कारण मी त्यांचा संघ पूर्वी कसा होता, हे पाहिले आहे. परंतु, आता त्यांच्या संघात गुणवत्तेची कमी आहे. त्यात कोणती स्पर्धाच नव्हती. त्यापेक्षा मी भारतचा ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, इंग्लंड, श्रीलंका अगदी अफगाणिस्तानविरुद्धचा सामना पाहिला असता. मला वाटत नाही की भारत आणि पाकिस्तान यांच्यात आता रोमांच राहिला आहे. आपण या सामन्याला खूप हवा देतो, परंतु गेली पाच वर्षे ही हवा फुसकीच ठरत आहे. हा



सामना आता एकतर्फी होत आहे, असे सौरव गांगुली यांनी सांगितले.

## वासांबे प्रिमियर लीग २०२५ | एकूण २२७ खेळाडूंचा सहभाग

# मोहपाड्यात रंगणार क्रिकेटचा थरार

**| रसायनी | प्रतिनिधी |**

वासांबे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संदीप मुंढे आयोजित वासांबे प्रिमियर लीगचे दोन पर्व उत्साहात पार पडले. त्यामुळे यंदाही वासांबे-मोहोपाडा प्रिमियर लीग पर्व ३चे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने २०२५ सालचा खेळाडू लिलाव सोहळा नुकताच पानशील-मोहोपाडा येथील वृंदावन फार्म येथे पार पडला.



वासांबे प्रिमियर लीग पर्व ३ मध्ये एकूण १२ संघांची नोंदणी झाली आहे. या लिलाव सोहळ्यासाठी १२ अष्टपैलू, १२ फलंदाज, १२ गोलंदाज यांसह नियमित नोंदणी झालेल्या अशा एकूण २२७ खेळाडूंचा यादीमध्ये सहभाग झाला होता. या लिलावात यंदाचा सर्वाधिक बोली लावण्यात आलेला खेळाडू तन्वीर चौधरी हा ठरला आहे. या प्रिमियर लीगमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय असे पारितोषिक व रोख रक्कम असून दुचाकी, एल.ई.डी टीव्ही, लकी ड्रॉ सारखे अन्य पारितोषिकांची खेळाडूंना जिंकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यावेळी पर्व ३च्या चषकाचे अनावरण देखील उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. तर, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टि. के. माळी, संतोष चौधरी व रोशन पाटील यांनी पार पाडले.

वासंबे प्रीमियर लीगच्या पहिल्या पर्वात राजवाड्याचा राजा या संघाने पहिले पारितोषिक पटकाविले होते; तर, दुसऱ्या पर्वात श्री गणेश इलेव्हन गणेश नगर या संघाने पहिले पारितोषिक पटकावले होते. मात्र, तिसऱ्या पर्वात कोण बाजी मारणार, याची मोठी चुरस प्रेक्षकांना सामन्यादरम्यान पाहायला मिळणार आहे.

### १२ संघांची नोंदणी

**वासांबे प्रिमियर लीग पर्व ३मध्ये एकूण १२ संघांची नोंदणी झाली आहे. त्यात विघ्नेश इलेव्हन वरोसे, धैर्यशील इलेव्हन आई एकविरा लोधीवली, कपिल एंटरप्राईजेस रीस, आई टाकेदेवी दांड फाटा, एन डिज नक्ष वेदांत इलेव्हन कांबे, श्री गणेश इलेव्हन गणेश नगर, यश युवराज इलेव्हन चांभार्ली, कैवल्य मंथन इलेव्हन मोहोपाडा, अनन्या इंटरप्रायजेस तळेगाववाडी, मल्लिकार्जुन खाने आंबिवली, बल्लाळेश्वर आळी आंबिवली व राजवाड्याचा राजा या संघांचा समावेश आहे.**

# बास्केटबॉलमध्ये पुण्याचा संघ अजिंक्य

**| पुणे | प्रतिनिधी |**

सोलापुर शहर व जिल्हा आणि महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेच्यावतीने सोलापुर येथे घेण्यात १३ वर्षांखालील गटाच्या राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या बास्केटबॉल कोर्टवर पार पडल्या. या स्पर्धेतील मुलींच्या गटात पुण्याच्या संघाने विजेतेपद पटकावले आहे. तर, सातारा संघाने तिसरा क्रमांक मिळवला आहे.



सोमवारी झालेल्या मुलींच्या गटाच्या अंतिम लढतीत पुणे संघाने उत्तर मुंबई संघाचा ४५-१२ असा ३३ गुणांनी पराभव केला. मध्यतरांस पुण्याकडे २५-१२ असा तेरा गुणांची आघाडी होती. त्यात महत्त्वाचा वाटा रुद्राणी हाळीघोंगडे (१६ गुण) आणि तनरिका चक्रवर्तीने (१० गुण) केलेल्या सुरेख खेळाचा होता. उत्तर मुंबईकडून अकैशा शेठ आणि किरत कौर कौन्सलने केलेली खेळी अपुरी ठरली. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत सातारा संघाने नागपूर संघावर चुरशीच्या लढतीत २७-२५ असा केवळ दोन गुणांनी विजय मिळविला. मध्यतरांस नागपूर संघाने ११-८ अशी तीन गुणांची आघाडी मिळवली होती. यावेळी विजयी संघाकडून रेवा नारकर (७ गुण) व विरा भांगणे (६ गुण) तर पराभूत संघाकडून स्वारनिका गट व स्वरा पालकरने केलेली खेळी अपुरी पडली. उपांत्य फेरीत पुणे संघाने सातारा संघावर ४४-१५ असा २९ गुणांनी तर उत्तर मुंबई संघाने नागपूर संघावर ३७-३१ असा सहा गुणांनी विजय मिळविला होता.

## निवडक

### दविंदरसिंह धुप्पड यांची मॅरेथॉनमध्ये 'सुवर्ण' धाव

**श्रीरामपूर :** महाराष्ट्रातील सर्वात अवघड मानल्या जाणाऱ्या सातारा हिल मॅरेथॉनमध्ये रविवारी (दि.१४) श्रीरामपूर रनिंग क्लबचे 'मिल्खा सिंह' म्हणजेच दविंदरसिंह धुप्पड यांनी सुवर्ण कामगिरी साकारत शहराचे नाव डोंगराळ शिखरांवर कोरले आहे. २१.१ किमी अंतराचा हा हाफ मॅरेथॉन ट्रॅक ४५० मीटर इलीव्हेशन गेनसह अतिशय कठीण मानला जातो. धुप्पड यांनी केवळ १ तास ५७ मिनिटांत अंतिम रेषा गाठत सुवर्णपदक पटकावले आहे. प्रेक्षकांनी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करत त्यांना 'हिल चॅम्पियन' म्हणून गौरवले. धुप्पड यांनी मागील तीन महिन्यांपासून चंदनापुरी घाट, गोरक्षनाथ गडसारख्या डोंगराळ मार्गावर सराव केला होता. धुप्पड यांच्यासोबत श्रीरामपूरचे इतर धावपटूही चमकले आहेत. त्यात रवींद्र निकम, विशाल कोटक, उमेश भोसले, डॉ. संकेत मुंदडा, विनायक शिंदे, राहुल सागडे यांनी रौप्यपदक पटाकवले आहे. तर, डॉ. रवींद्र भीटे आणि रोहित राऊत यांनी कांस्यपदक पटकावले आहे.

### महिला प्रीमियर लीग २०२६
### जानेवारीमध्ये सुरू होण्याची शक्यता



**नवी दिल्ली :** महिला प्रीमियर लीग २०२६ बाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. स्पर्धेचा पुढील हंगाम कधी सुरू होईल, हे सांगण्यात आले आहे. आतापर्यंत डब्ल्यूपीएलचे तीन हंगाम खेळले गेले आहेत आणि तिन्ही हंगाम खूप यशस्वी झाले आहेत. या स्पर्धेद्वारे भारत आणि इतर देशांतील महिला क्रिकेटपटूंना त्यांची प्रतिभा सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे. महिला प्रीमियर लीग २०२६ जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात सुरू होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ही स्पर्धा ६ किंवा ८ जानेवारीपासून सुरू होऊ शकते. डब्ल्यूपीएलचा चौथा हंगाम मागील हंगामापेक्षा लवकर सुरू होणार आहे. डब्ल्यूपीएलला आता महिला फ्युचर टूर्स प्रोग्राममध्ये एक विशेष विंडो दिली जाणार असून ही स्पर्धा त्याच विंडोमध्ये खेळवली जाणार आहे. मात्र, या स्पर्धेच्या अंतिम सामन्याची तारीख अद्याप स्पष्ट झालेली नाही; परंतु, या लीगमध्ये फक्त २२ सामने खेळवले जाणार असून बीसीसीआयला हे सामने पूर्ण करण्यासाठी २६ ते २७ दिवस लागतील. अशा प्रकारे, फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात स्पर्धा संपण्याची शक्यता आहे. डब्लूपीएलचा पहिला हंगाम ४ मार्च ते २६ मार्च, दुसरा हंगाम २३ फेब्रुवारी ते १७ मार्च आणि तिसरा हंगाम १४ फेब्रुवारी ते १५ मार्च या कालावधीत खेळवण्यात आला होता. तसेच, चौथा हंगाम कुठे खेळवायचा याबद्दल अद्याप ठिकाणे निश्चित झालेली नाहीत. या स्पर्धेत एकूण ५ संघ सहभागी होतात. ज्यामध्ये मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स, यूपी वॉरियर्स, गुजरात जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांचा समावेश आहे.

### स्मृती मानधनाचा जगभरात दबदबा

**नवी दिल्ली :** भारताच्या महिला संघातील सलामीवीर स्मृती मानधना हिने आयसीसीच्या ताज्या एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले आहे. एकदिवसीय विश्व चषक स्पर्धेपूर्वी स्मृतीसाठी ही खूप मोठी गोष्ट आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात स्मृतीने अर्धशतकीय खेळी केली होती. त्याचाच फायदा तिला ताज्या क्रमवारीत झाला आहे. तिने इंग्लंडची कर्णधआर नॅट शिव्हर ब्रंटला मागे सोडले आहे. स्मृतीचे रेटिंग पॉइंट ७३५ झाले आहेत. तसेच, अव्वल दहामध्ये स्मृती एकमेव भारतीय खेळाडू आहे. स्मृतीने यापूर्वी २०१९ मध्ये एकदिवसीय क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले होते. गोलंदाजीत इंग्लंडची सोफी एक्लेस्टन अव्वल स्थानावर आहे. त्यानंतर अव्वल पाच खेळाडूंमध्ये ४ ऑस्ट्रेलियन गोलंदाज आहेत. भारताची दीप्ती शर्मा तीन स्थान खाली घसरली असून ती सातव्या क्रमांकावर पोहोचली आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)